




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६५ ■ शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## रुपया वाचवण्यासाठी चलन साठ्याला झळ!

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे भारताला मोठा फटका बसत आहे. एकीकडे, देशांतर्गत बाजारात महागाई वाढत आहे, तर दुसरीकडे भारताचा परकीय चलन साठा झपाट्याने कमी होत आहे. पश्चिम आशियात युद्धाचा भडका उडाल्यापासून भारतीय रुपया सतत घरंगळत असून चलनाला आधार देण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या उपाययोजनांचा परिणामी परकीय गंगाजळीवर होताना दिसत आहे. सलग चौथ्या आठवड्यात भारताच्या परकीय चलन साठ्यात लक्षणीय घट झाली आहे. परिस्थिती अशी आहे की गेल्या महिन्यात भारताचा परकीय चलन साठा ७२८ अब्ज डॉलरवरून ६८८ अब्ज डॉलरवर खाली आला आहे.

# इराणने रस्ता रोखला..!

## भारताने शोधली नवी वाट; आफ्रिकेतील देशांशी मैत्री अन् रशियाची साथ!

वृत्तसंस्था ४ एप्रिल

**नवी दिल्ली :** इराण-इस्रायलमधील वाढता तणाव आणि 'स्ट्रेट ऑफ होर्मुज'मधील कोंडीमुळे सध्या संपूर्ण जग ऊर्जा संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जगाच्या एकूण तेल पुरवठ्यापैकी २० टक्के हिस्सा ज्या मार्गावरून जातो, तो मार्गच इराणने रोखून धरल्याने पाश्चात्य देशांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, अशा भीषण युद्धजन्य परिस्थितीतही भारताने आपली 'एनर्जी सिक्युरिटी' अत्यंत




चाणाक्षपणे जपली आहे. रशियाची साथ आणि आफ्रिकेतील काही छोट्या, अपरिचित देशांशी केलेली मैत्री भारतासाठी गेम चेंजर ठरली आहे.

भारत आपल्या गरजेच्या कच्च्या तेलापैकी ४० ते ५० टक्के तेल स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून आयात करतो. हा मार्ग बंद झाल्याने भारतात इंधन टंचाई निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. मात्र, भारताच्या परराष्ट्र आणि पेट्रोलियम मंत्रालयाने अत्यंत वेगाने पावले उचलली. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताने आता केवळ आखाती देशांवर अवलंबून न राहता आपला मोर्चा आफ्रिकेकडे वळवला आहे. गेल्या महिन्याभराच्या तुलनेत आज भारताची स्थिती अधिक भक्कम आहे.

### सौदी आणि युएईचा बायपास मार्ग

समुद्री मार्गावर संकट असले तरी सौदी अरेबिया आणि युएई यांनी भारताला पाइपलाइनद्वारे मदत सुरू ठेवली आहे. सौदीची 'ईस्ट-वेस्ट यानबू पाइपलाइन' आणि युएईची 'हबशान-फुजैराह पाइपलाइन' यांमार्फत होर्मुजची कोंडी टाळून तेल पुरवठा सुरू आहे.

भारतातील कच्च्या तेलाची आणि गॅसची उपलब्धता आता पूर्वीपेक्षा अधिक सुधारली आहे. आम्ही पुरवठ्याचे स्रोत बदलले असून भविष्यातील कोणत्याही संकटाचा सामना करण्यास सज्ज आहोत,' असा विश्वास पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी व्यक्त केला आहे.

### रशियाकडून तेल खरेदीत ९० टक्क्यांची मोठी वाढ

अमेरिकेसोबतच्या काही तांत्रिक चर्चांमुळे गेल्या दोन-तीन महिन्यांत रशियाकडून होणारी तेल आयात काहीशी मंदावली होती. मात्र, आखाती देशांतील संकट पाहता अमेरिकेने भारताला रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची विशेष सवलत दिली आहे. याचाच फायदा घेत भारताने मार्च महिन्यात रशियाकडून होणारी कच्च्या तेलाची खरेदी फेब्रुवारीच्या तुलनेत तब्बल ९० टक्क्यांनी वाढवली आहे. रशियाकडून येणारी ही स्वस्त तेलाची रसद भारताची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे.

# कार नदीत बुडून 9 जणांना जलसमाधी!

प्रतिनिधी ४ एप्रिल

**नाशिक :** एक आनंदाचा कार्यक्रम, हसत-खेळत चाललेला प्रवास आणि घराची ओढ... पण नियतीला काही वेगळंच मान्य होतं. अवघ्या काही क्षणांत होत्याचं नव्हतं झालं आणि एकाच कुटुंबातील नऊ जणांवर काळाने झडप जलसमाधी दिली. दिंडोरीतील शिवाजी नगर भागात शुक्रवारी रात्री एक भरधाव कार अनियंत्रित होऊन थेट विहिरीत कोसळली. या भीषण अपघातात लहान मुलांसह एकाच कुटुंबातील ९ जणांचा करुण अंत झाला. या घटनेने संपूर्ण नाशिक जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

दिंडोरी तालुक्यातील इंदोरे गावातील दरगोडे कुटुंब एका खाजगी क्लासच्या स्नेहसंमेलनासाठी दिंडोरी शहरात आले होते. कार्यक्रम आनंदात पार पडल्यानंतर सर्वजण आपल्या 'इर्टिका' कारने (क्रमांक एमएच १५-जेएस-१०५३) घराकडे परतत होते. रात्री १० वाजेच्या सुमारास शिवाजी नगर भागातील राजू राजे यांच्या विहिरीजवळ चालकाचा कारवरील ताबा सुटला. यानंतर भरधाव कार थेट पाण्याने काठोकाठ भरलेल्या विहिरीत कोसळली. अपघाताचा आवाज होताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र, विहीर खोल आणि पाण्याने भरलेली असल्याने कारचा शोध घेणे कठीण जात होते. त्यातच रात्रीचा दाट अंधार असल्याने बचाव कार्यात मोठे अडथळे येत होते. घटनेची माहिती मिळताच प्रशासन, पोलीस आणि एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल झाले. शेवटी क्रेनच्या साहाय्याने कार विहिरीबाहेर काढण्यात आली, मात्र तोपर्यंत आतील नऊही जणांचा श्वास थांबला होता.




### अशी आहेत मृतकांची नावे

सुनील दत्तात्रय दरगोडे (३२), रेशमा दरगोडे (२७), आशा दरगोडे (३२), गुणवती दरगोडे (११), श्रेयश दरगोडे (११), श्रावणी दरगोडे (११), सृष्टी अनिल दरगोडे (१४), समृद्धी दरगोडे (७), श्रद्धा दरगोडे सर्व रा. इंदोरे यांचा मृतकांमध्ये समावेश आहे.

### अपघातातील कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

दिंडोरी येथील घडलेल्या दुर्दैवी घटना स्थळी मंत्री गिरीश महाजन यांनी भेट देत पाहणी केली. तसेच गावकऱ्यांच्या मागणीनुसार विहिरी तत्काळ बुजवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मयत यांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत देण्यात येणार असल्याची माहिती गिरीश महाजन यांनी दिली.

### विहीर मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

भीषण अपघातात एकाच कुटुंबातील ९ जण दगावले. सिमेंट कॉंक्रीटचा कॉलनी रस्त्याला लागूनच असलेल्या विहिरीत कार कोसळल्याने हा अपघात झाला. रस्ता संपतो आणि ३ फुटावर रस्त्याच्या समोरच विहीर असल्याने कार थेट विहिरीत पडून अपघात झाला. या घटनेप्रकरणी विहीर मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डिझेलचा तुटवडा व काळाबाजारामुळे वाहतूकदार त्रस्त

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला:** राष्ट्रीय महामार्गावरील डिझेलच्या तीव्र तुटवड्याविरोधात आणि पेट्रोल पंप चालकांकडून होणाऱ्या कथित काळाबाजाराच्या विरोधात ट्रक वाहतूकदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अनेक ट्रकचालक डीजल तुटवड्याबद्दल आपली चिंता व्यक्त करीत आहेत. वाहतूकदारांनी महामार्गांवर डिझेलचा तुटवडा असल्याची माहिती दिली. जिथे डिझेल उपलब्ध आहे, तिथे पंप चालक प्रत्येक वाहनाला फक्त ५० ते १०० लिटर डिझेल देत आहेत. त्यामुळे बाहेरगावी माल घेऊन जाण्यास ट्रक चालकांना उशीर होत आहे. डिझेलच्या कमतरतेमुळे ट्रक असुरक्षित ठिकाणी उभे केले जात आहेत, ज्यामुळे माल चोरीचा धोका निर्माण झाला आहे.




**पेट्रोल पंपांवर आरोप**

वाहतूकदारांनी गंभीर आरोप केले आहेत की त्यांना डिझेल नाकारले जात आहे. दुसरीकडे, काही पंप चालक जास्त दर आकारून डिझेल टँकर इतर शहरांमध्ये पाठवत आहेत. सर्वात मोठी समस्या हिंदुस्तान पेट्रोलियमच्या पंपांवर दिसून येत आहे. पुरावा म्हणून काही ट्रकचालक पंपांचे फोटोही दाखवत आहेत, अनेक शहरांमध्ये वाहतूकदार संघटना आंदोलन करण्याच्या मोडवर आले आहेत शहरातही वाहतूकदार संघटनेतर्फे जर या समस्येचा निकाल न लागल्यास आंदोलन करण्याची चेतावणी दिली जात आहे या समस्येकडे जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीरतेने लक्ष द्यावे अशी मागणीही होत आहे

## इराणचा पाकिस्तानला दे दणका!

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका युद्ध सुरू आहे. ३५ दिवसांपेक्षा अधिक दिवसांपासून युद्ध सुरू आहे. या युद्धात सुरूवातीपासूनच पाकिस्तानची लुडबुड आहे. पाकिस्तान या युद्धात मध्यस्थी करत असल्याचे दाखवत आहे. मात्र, त्यांची हीच मध्यस्थी त्यांच्यावर भारी पडली. पाकिस्तानच्या मध्यस्थीला मोठे अपयश आले. इराणकडून पाकिस्तानच्या मध्यस्थीला नाकारण्यात आले. यासोबतच थेटपणे इस्त्रायलकडूनही त्यांच्यावर निशाणा साधण्यात आला.

# सुनेत्रा पवार उद्धव ठाकरेंसह कॉंग्रेसच्या संपर्कात!

## बारामती पोटनिवडणुकीत घडामोडींना वेग

प्रतिनिधी ४ एप्रिल

**बारामती :** बारामती पोट निवडणुकीच्या अनुषांगाने राज्याच्या राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. अशातच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंना फोन केल्याची माहिती समोर आली आहे. फोन करून सुनेत्रा पवारांनी उद्धव ठाकरेंना बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत पाठिंबा देण्याची विनंती केली असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कॉंग्रेसच्या नेत्यांनाही पाठिंब्यासाठी सुनेत्रा पवार विनंती करणार असल्याची माहिती समोर आली आहे. तर बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रयत्न सुरू झाले आहेत. सुनेत्रा पवार सोमवारी (६ एप्रिलला) आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते, मंत्री उपस्थित राहणार आहेत. बारामती पोटनिवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्ष आपला उमेदवार देणार असल्याच्या चर्चा आहेत, निवडणुकीसाठी कॉंग्रेसने काही इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती देखील घेतल्याची माहिती काल समोर आली होती. कॉंग्रेस पक्ष महाविकास आघाडीतील इतर मित्र पक्षांशी देखील उमेदवारी बाबत चर्चा करत आहे, अशातच राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून बारामती पोटनिवडणूक ही बिनविरोध करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.



### २३ एप्रिलला मतदान

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. राहुरी आणि बारामतीसाठी २३ एप्रिलला मतदान होईल तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधनामुळे जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे.

# वेस्टर्न कोल फिल्डस मध्ये नोकरीचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला:** सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या २७ सुशिक्षित तरुण-तरुणींना 'वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड' मध्ये नोकरी लावून देतो असे सांगून कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार अकोल्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी नागपूरमधून मुख्य सूत्रधाराला अटक केली आहे.

अकोल्यातील सुमारे २७ बेरोजगार तरुण-तरुणींना वेस्टर्न कोल फिल्डस मध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. प्रत्येक उमेदवाराकडून १५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती, ज्यापैकी ८ ते ६ लाख रुपये आगाऊ स्वरूपात घेण्यात आले. अशा प्रकारे २७ लोकांकडून कोट्यवधी रुपये उकळण्यात आले.



या फसवणूक प्रकरणात अकोल्यातील तीन आणि नागपूरमधील एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वासुदेव हलमारे असे अटक करण्यात आलेल्या मुख्य सूत्रधाराचे नाव असून, त्याला पोलिसांनी नागपूरमधून ताब्यात घेतले आहे. पोलिसांची कारवाई आणि सद्यस्थिती सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'या व्यवहारासाठी नागपूरचा वासुदेव हलमारे आणि अकोल्याचा दलाल आशुतोष चंगोईवाला यांनी संगनमताने तरुणांकडून पैसे घेतले होते. सध्या मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली असून, आशुतोष चंगोईवाला अद्याप फरार आहे.

## पाकिस्तानात पेट्रोल ४५८ रुपयांपार!

**नवी दिल्ली :** पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत आज शनिवारी पुन्हा कोणताही बदल पाहायला मिळालेला नाही. राष्ट्रीय राजधानी दिल्लीत पेट्रोल ९४.७७ रुपये प्रति लिटर दरानं विकले जात आहे. तर, मुंबई, पुणे येथे १०४.२१ रुपये प्रति लिटर आहे. सध्या जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींनी उच्चांक गाठला आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत होत असलेल्या वाढीमुळे जागतिक स्तरावर कच्चे तेल महागले. मात्र, देशांतर्गत पातळीवर भारत सरकारने सामान्य जनतेला आतापर्यंत या दरवाढीचा चटका लागू दिलेला नाही. पाकिस्तान सरकारने गुरुवारी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ करण्याची घोषणा केली. पेट्रोल आणि हाय-स्पीड डिझेलच्या किमतीत अनुक्रमे ४३ टक्के आणि ५५ टक्के अशी मोठी वाढ करण्यात आली आहे. या निर्णयानुसार, पेट्रोलची किंमत ३२१.१७ रुपयांवरून १३७.२३ रुपयांनी वाढवून ४५८.४१ रुपये प्रति लिटर करण्यात आली आहे. तसंच हाय-स्पीड डिझेलची किंमत ३३५.८६ रुपयांवरून १८४.४९ रुपयांनी वाढवून ५२०.३५ रुपये प्रति लिटरवर पोहोचली.

# दिव्यांग शिक्षक बदली प्रक्रियेत घोळ

## गटशिक्षणाधिकारी गौतम बडवे निलंबित

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला:** दिव्यांग शिक्षक बदली प्रक्रियेत झालेल्या नियमभंग प्रकरणी बाळापूर येथील शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी गौतम बडवे यांना निलंबित करण्यात आले आहे.

दिव्यांग शिक्षकांच्या बदलीसाठी आवश्यक असलेल्या निकषांची योग्य तपासणी न केल्याचा ठपका बडवे यांच्यावर ठेवण्यात आला आहे. दिव्यांगत्वाची टक्केवारी ४० टक्क्यांपेक्षा कमी असतानाही एका शिक्षकाला बदलीस पात्र ठरविण्यात आल्याचे तपासात उघड झाले. तसेच, चुकीच्या पद्धतीने लाभ

घेतलेल्या संबंधित शिक्षकाविरुद्ध कोणतीही कारवाई प्रस्तावित न केल्याचाही आरोप आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या आदेशानुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी शासकीय कामकाजात नियमबाह्य वर्तन



केल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियमांनुसार निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्याचे स्पष्ट झाले आहे.

निलंबन कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली असून, परवानगीशिवाय मुख्यालयाबाहेर जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास पुढील कडक कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. दिव्यांगत्वाची टक्केवारी ४० पेक्षा कमी असतानाही शिक्षकाला बदलीस पात्र ठरविल्यामुळे ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदचे शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी दिली आहे.

# पहिल्यांदाच 100 कुटुंबांना 'पीएनजी'चे घरगुती कनेक्शन!

## नागपूरकरांसाठी आनंदवार्ता; एलपीजी सिलेंडरच्या कटकटीपासून मुक्तता

प्रतिनिधी ४ एप्रिल

**नागपूर :** नागपूरकरांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. एलपीजी सिलेंडरच्या कटकटीपासून त्यांच्या सुटकेची मोठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. १० एप्रिल रोजी नागपूरच्या वेशीवरील बुटीबोरी येथील शंभर कुटुंबांना 'पाइप्ड नॅचरल गॅस' म्हणजेच 'पीएनजी'चे कनेक्शन मिळणार आहे. त्या माध्यमातून नागपूर जिल्ह्यात पीएनजी स्वरूपात घरगुती गॅसचा पुरवठा पहिल्यांदाच होणार आहे. पुढे टप्प्याटप्प्याने संपूर्ण नागपूर शहरात आणि जिल्ह्यातही पीएनजी गॅस कनेक्शनचा विस्तार केला जाणार आहे.

नागपूर जिल्ह्यात पीएनजीचे नेटवर्क विस्तारण्याची जबाबदारी 'हरियाणा सिटी गॅस' म्हणजेच गेल कंपनीला देण्यात आली आहे. मुळात गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड म्हणजेच गेल ची एक मुख्य पाईप लाईन समृद्धी महामार्गलगत मुंबईपासून नागपूरपर्यंत आली आहे. गेल या मुख्य पाईपलाईन मधून नॅचरल गॅसचा पुरवठा घेऊन एचसीजी कंपनी नागपूर जिल्ह्यातील लाखो घरापर्यंत पीएनजीचा पुरवठा करणार आहे. सध्या एचसीजी कडून बुटीबोरीपर्यंत पीएनजी आणण्यासाठी ३० किलोमीटरची पाईपलाईन टाकण्यात आली आहे.

### जोडणीसाठी ९ हजार ५०० रूपये खर्च

सध्या मिळालेल्या माहितीनुसार प्रत्येक पीएनजी कनेक्शनसाठी ग्राहकाला साडेनऊ हजार रुपयांचा खर्च येईल. हा खर्च पीएनजीच्या ग्राहकाला एकत्र करता येईल किंवा टप्प्याटप्प्याने देता येईल.

### पीएनजी गॅस किमान २० ते २५ टक्के स्वस्त

एचसीजी कंपनीचा दावा आहे की, एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुलनेत पीएनजी गॅस किमान २० ते २५ टक्के स्वस्त राहील. तसेच एलपीजीचे तुलनेत पीएनजी जास्त सुरक्षित ही आहे. शिवाय त्याचा अखंडित पुरवठा असल्याने दरवेळेला सिलेंडरच्या बुकिंगपासून लोकांची सुटका होणार आहे.

### नागपूर शहरात आणि जिल्ह्यात असा होईल विस्तार

बुटीबोरीमधील काही इमारतीनंतर जामठा आणि मिहान भागातील निवासी इमारतींना पाइप्ड नेचरल गॅसच्या नेटवर्कशी जोडले जाईल. त्यानंतर पीएनजीचे विस्तार हिंगणा, वानाडोंगरी, वाडी या नागपूरच्या पश्चिम सीमेवरील वस्त्यांमध्ये केले जाईल. त्यानंतर नागपूर शहरातील बेसा, बेलतरोडी, मनीष नगर, उज्वलनगर या भागातील वस्त्यांसह संपूर्ण नागपूरमध्ये टप्प्याटप्प्याने पीएनजी कनेक्शन दिले जाणार आहे. पुढील आठ वर्षात नागपूर शहरासह संपूर्ण नागपूर जिल्ह्यात प्रत्येक घरात पीएनजी गॅस चा कनेक्शन दिला






CMYK

*जगाच्या इतिहासाकडे पाहिले की अनेकदा एक प्रश्न मनात घोळतो समाजाला खरी दिशा कोण देतो धनसंपत्तीचे वैभव, पुरुषी सामर्थ्याचा गर्व, की करुणा, संवेदनशीलता आणि धैर्याचा संगमया प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला एक सत्य उमगते स्त्रीशक्ती हीच समाजशक्ती आहे. आज स्त्रिया जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहेत. शिक्षण, राजकारण, सामाजिक कार्य, उद्योगधंदा, विज्ञान, क्रीडा कोणते असे क्षेत्र नाही जिथे त्यांच्या पावलांची चाहूल नाही? आज स्त्री ही केवळ घराची 'गृहलक्ष्मी' राहिलेली नाही; ती समाजाच्या प्रत्येक वाटचालीची दिशा ठरवणारी नेत्री, प्रेरक आणि परिवर्तनकर्ती ठरते आहे.*

# महिला नेतृत्त्व समाज परिवर्तनाची अमृतधारा !!




महिला नेतृत्त्वाचा अर्थ नेतृत्त्व म्हणजे केवळ निर्णय घेणे नाही. नेतृत्त्व म्हणजे मार्गदर्शन, सर्वांना एकत्र आणणे, समता आणि न्यायाचा ध्यास घेणे, संघर्षांना सामोरे जाताना धैर्य दाखवणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'मानवतेचे रक्षण' करणे. स्त्री या सर्व गुणांनी नटलेली आहे. तिच्या नेतृत्त्वात करुणा आहे, समजूतदारपणा आहे, सहनशीलता आहे, आणि त्याचबरोबर कठोर निर्णय घेण्याचे धैर्यही आहे. म्हणूनच महिला नेतृत्त्व हे पुरुष नेतृत्त्वापेक्षा वेगळे, अधिक सर्वसमावेशक, अधिक संवेदनशील आणि अधिक दूरदृष्टीचे ठरते. इतिहासातील तेजस्वी उदाहरणे भारतीय समाजात अनेक महिलांनी आपली छाप उमटवली आहे.

सावित्रीबाई फुले – अंधारात दिवा पेटवणारी. स्त्री शिक्षणाचा पाया घालणारी. अन्यायाला डोळसपणे सामोरी जाणारी. अहिल्याबाई होळकर प्रजेला मायेसारखे सांभाळणारी. मंदिर, घाट, विहिरी, धर्मशाळा उभारून जनकल्याण करणारी.

इंदिरा गांधी कठीण काळात राष्ट्राला मार्गदर्शन करणारी 'लोखंडी महिला.' प्रतिभा पाटील राष्ट्राच्या सर्वोच्च पदावर विराजमान होऊन स्त्री शक्तीचे नवे पर्व लिहिणारी. कल्पना चावला आकाशाला गवसणी घालणारी, जगाला प्रेरणा देणारी. या महिलांनी दाखवून दिले की स्त्री म्हणजे केवळ घरापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण विश्वाला दिशा देऊ शकते. आधुनिक काळातील महिला नेतृत्त्व आजच्या जागतिकीकरणाच्या युगात स्त्रिया केवळ सामाजिक कार्यापुरत्या मर्यादित नाहीत.

उद्योगधंदा, तंत्रज्ञान, संरक्षण, अवकाश संशोधन, राजकारण अशा कठीण क्षेत्रांतही महिला नेतृत्व सिद्ध करत आहेत.

भारतातील निती निर्मितीत महिला अधिकारी, राजकारणी, वैज्ञानिक, उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या महत्त्वाचा वाटा उचलत आहेत. त्या केवळ निर्णयक्षम नाहीत तर निर्णय प्रक्रियेला मानवी चेहरा देतात.

महिला नेतृत्वाचे सौंदर्य म्हणजे त्याचा संतुलित दृष्टिकोन. स्त्री मनाने संवेदनशील असते, पण त्याचवेळी संकटात खंबीरही असते. ती आपल्याच नव्हे तर इतरांच्याही वेदना ओळखते. तिच्या नेतृत्त्वात 'मी' पेक्षा 'आपण' हा भाव अधिक ठळक असतो.

संत तुकाराम महाराज म्हणतात, 'आधी करून ठेवावे, पर उपदेशावे...' स्त्री नेतृत्त्व ह्याच तत्वावर चालते. त्या स्वतः कृतीतून दाखवून देतात आणि मग इतरांना मार्ग दाखवतात.

समाजपरिवर्तनात महिला नेतृत्त्वाची भूमिका महत्त्वाची आहे स्त्री समाजात समता निर्माण करतात. त्या अन्यायाला तोंड देतात, न्याय्य निर्णय घेतात, सर्वांना सोबत घेऊन चालतात. त्यांच्या कार्यामुळे कुटुंबातील समजूत वाढते, समाजातील संघर्ष कमी होतात, पुढच्या पिढीला आदर्श घडतो.

म्हणूनच आजच्या समाजात महिला नेतृत्त्व हे केवळ आवश्यक नाही तर अत्यावश्यक आहे. तथापि, महिला नेतृत्त्वाचा प्रवास सहजसोपा नाही. समाजातील परंपरागत अडथळे, असमानतेची दृष्टी, कौटुंबिक जबाबदाऱ्या हे सर्व स्त्रीसमोर भिंत उभी करतात. पण ती हार मानत नाही. अगदी काटेरी वाटेवरून चालत ती पुढे जाते आणि इतरांसाठी ती वाट प्रशस्त करते.

जगभरात अँजेला मर्केल (जर्मनी), जसिंडा आर्डर्न (न्यूझीलंड), मलाला युसुफझाई (शिक्षणासाठी लढणारी) अशा महिला नेत्या जागतिक पटलावर आदर्श निर्माण करत आहेत. त्यांच्या नेतृत्वात सहानुभूती, दूरदृष्टी आणि धैर्य दिसते. त्या सिद्ध करतात की स्त्रीचे नेतृत्त्व केवळ कुटुंबापुरतेच मर्यादित नसून ते संपूर्ण जग बदलू शकते.

आज भारतासमोर अनेक प्रश्न उभे आहेत गरीबी, विषमता, बेरोजगारी, हिंसा, अन्याय. या प्रश्नांवर उत्तर शोधताना महिला नेतृत्त्व हा नवा किरण आहे. कारण त्या समाजाला न्याय्य दिशा देऊ शकतात.

त्या संघर्षाला सकारात्मक उर्जेत रूपांतरित करू शकतात. त्या पुढच्या पिढीला नवा आदर्श देऊ शकतात. आज आपण ठामपणे म्हणू शकतो की महिला नेतृत्त्व हे केवळ पद नाही, ते समाजपरिवर्तनाची शक्ती आहे. ज्या समाजात महिलांना नेतेपद मिळते, तो समाज अधिक संवेदनशील, अधिक न्याय्य आणि अधिक प्रगतिशील बनतो. स्त्री ही ममता आहे, स्त्री ही धैर्य आहे, स्त्री ही न्यायाची दिशा आहे, स्त्री ही भविष्याची प्रेरणा आहे. म्हणूनच आज आपण सर्वांनी हा प्रण घ्यायला हवा स्त्रीशक्तीला समान सन्मान देऊ, महिला नेतृत्त्वाला प्रोत्साहन देऊ, आणि समाजाला खरी दिशा दाखवणाऱ्या या अमृतधारेचा लाभ घेऊ. महिला नेतृत्त्व म्हणजे समाजातील परिवर्तनाची नदी, प्रेरणेची ज्योत आणि न्यायाची वाट दाखवणारा दीपस्तंभ आहे.

आजचा काळ आपल्याला हाक देतो 'स्त्रीशक्ती हीच खरी समाजशक्ती, महिला नेतृत्त्व हीच उद्याच्या भारताची दिशा.' परंतु पुरुषांनी आपला पुरुषीपणा बाजूला ठेवून आपल्या घरच्या महिलांना पुढे जाण्यासाठी त्यांना सहकार्य करणे काळाची गरज आहे. जसे एखाद्या पुरुषाच्या यशामागे स्त्रीचा हात असतो तसेच आता पुढे झाले पाहिजे की स्त्रीच्या यशामागे पुरुषाचा हात होता हे महिलेने गर्वाने सांगितले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने महिलांना आपण न्याय देऊ शकतो. व ती सध्या काळाची गरज आहे. त्यासाठी पुरुषांनी आपली तयारी दर्शविली पाहिजे. परिवर्तन हा काळाचा नियम आहे त्याला कोणीही रोखू शकत नाही हे पुरुषांनी लक्षात घेऊन आपले योगदान देणे काळाची गरज आहे.


गजानन हरणे
खडकी, अकोला.
संवाद : ९८२२९४२६२३.

# 'स्क्रीन टाइम' बनतेय जागतिक समस्या !

फोनपासून टॅबलेटपर्यंत आणि स्मार्ट वॉचपासून टीव्हीपर्यंत सर्वत्र स्क्रीन सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळेच सध्या बहुसंख्य लोक इंटरनेटशी जोडलेले आहेत. त्याचे फायदे जसे आहेत, तसे दुष्परिणामही आहेत. मुलांमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचे निष्कर्ष काही संस्थांनी मांडले आहेत.

स्क्रीनद्वारे इंटरनेट वापरात सरासरी वेळ वाढत आहे. यातून डिजिटल युगात 'स्क्रीन टाइम' ही जागतिक समस्या ठरू पाहत आहे. स्वीडनने याचे गांभीर्य ओळखून मुलांच्या स्क्रीन टाइमवर बंधने घातली आहेत. अमेरिकेसह युरोपातील अनेक देशांनी यापूर्वीच असे नियम केले आहेत. भारतात तरी असे कोणतेही नियम नसले तरी पालकांमध्ये जागरूकता आणण्याचे प्रयत्न होत आहेत.

स्क्रीन टाइम म्हणजे स्मार्टफोन, कम्प्यूटर, टीव्ही, व्हिडीओ गेम किंवा टॅब्लेटसारख्या डिव्हाइसवर घालवलेला वेळ. भारतात सरासरी पाच तास स्क्रीन टाइमचा वापर होतो. स्क्रीन टाइम वापरामध्ये वय हा महत्त्वाचा घटक आहे. सुमारे दोन किंवा त्यापेक्षा कमी वयाचे मूल असलेले ७४ टक्के पालक दावा करतात, की त्यांचे मूल टीव्ही पाहते. ४१ टक्के पालक मान्य करतात, की स्क्रीन टाइम व्यवस्थापन आव्हानात्मक आहे. २१ टक्के मुले स्क्रीनवर किती वेळ घालवतात याबद्दल पालकांमध्ये अपराधीपणाची भावना बळावते. पाच वर्षांखालील मुलांना डिजिटल उपकरणांवर एक तास किंवा त्यापेक्षा कमी वेळ



घालवण्याची शिफारस जागतिक आरोग्य संघटना करते. एक वर्षांखालील मुलांना डिजिटल उपकरणांपासून लांब ठेवावे असेही आरोग्य संघटना सांगते.

### स्क्रीन टाइमचे दुष्परिणाम

**झोपेची कमतरता :** निळा प्रकाश (ब्लू लाइट) मेलाटोनिनच्या उत्पादनात हस्तक्षेप करतो आणि शरीराच्या 'सरकॅडियन' (ज्याला मेंदूतील २४ तासांचे अंतर्गत घड्याळ म्हटले जाते, जे झोपेची आणि सतर्कतेची वेळ नियंत्रित करते) लयीत व्यत्यय आणतो.

**लठ्ठपणा :** ५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये स्क्रीन टाइम आणि लठ्ठपणा यांच्यातील संबंध आकडेवारीतून स्पष्ट होतो. स्क्रीन पाहण्याच्या गतिहीन स्वभावामुळे लठ्ठपणा वाढण्याची शक्यता अधिक असते.

**टाइप २ मधुमेहाची संवेदनशीलता :** तीन तासांपेक्षा अधिक वेळ स्क्रीनवर घालवणाऱ्या अमेरिकेतील ९ ते १० वयोगटातील मुलांना इन्सुलिनला प्रतिकार होण्याची शक्यता जास्त असते.

**उशिरा शिकणे :** जी लहान मुले जास्त प्रमाणात टीव्ही पाहतात, त्यांना भाषा शिकण्यात अडचणी येतात.

**आत्महत्येचे विचार :** स्क्रीनच्या अतिवापरामुळे भावनिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतात. अभ्यासकांच्या मते, स्क्रीनच्या अतिवापरामुळे चिंता, उदासीनता वाढून आत्महत्येचे विचार येतात.

### सक्रियता सरासरी वेळ

| | |
|---|---|
| टीव्ही/ व्हिडीओ पाहणे | -३.१६ तास |
| गेमिंग | -१.४६ तास |
| सोशल मीडिया | - १.२७ तास |
| वेबसाइट | -५१ मिनिटे |
| इतर | -२९ मिनिटे |
| व्हिडीओ चॅटिंग | -२० मिनिटे |
| ई-वाचन | - १५ मिनिटे |
| कंटेंटनिर्मिती | - १४ मिनिटे |

### शून्य ते ११ वर्षे वयोगटातील मुलांचा स्क्रीन टाइम

| | |
|---|---|
| ८८ टक्के | -टीव्ही |
| ६७ टक्के | - टॅबलेट |
| ६०टक्के | -स्मार्टफोन |
| ४४ टक्के | -डेस्कटॉप/लॅपटॉप |
| ४४ टक्के | -गेमिंग |

### या देशांत स्क्रीन टाइमवर निर्बंध?

अमेरिका, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स आणि स्वीडन या देशांत शून्य ते १२ वर्षे वयोगटातील मुलांवर स्क्रीन टाइमची बंधने आहेत. फ्रान्समध्ये तीन वर्षांपेक्षा कमी, तर स्वीडनमध्ये दोन वर्षांपेक्षी कमी वयाच्या मुलांना स्क्रीनवर पूर्णत: निर्बंध घालण्यात आली आहेत.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग – मुख्यमंत्री

## अकोल्यासह १८ जिल्ह्यांचा समावेश



**अकोला / मुंबई :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी'(आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

### नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, ङअकोला,ङ लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. 'सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.'

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे. तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ञांनी स्पष्ट केले आहे.

### 'राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी'(आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

# होमिओपॅथीच्या रुग्णसेवेत सोशल इंजिनिअरिंगची गरज – डॉ.संदीप चव्हाण

## होमिओपॅथी महाविद्यालयात व्याख्यान

**अकोला :** आधुनिक व प्रगत होत चाललेल्या विज्ञान युगात वैद्यकीय वर्गाने रुग्णासोबत संवाद साधताना सोशल इंजिनिअरिंगची आवश्यकता असून आपल्या व्यवसायाचे ब्रँडिंग करताना अनेक पथ्य या दृष्टीने सांभाळण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ होमिओपॅथी तज्ञ डॉ.संदिप चव्हाण यांनी व्यक्त केले. होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित होमिओपॅथी महाविद्यालयात आयुष मंत्रालयाच्या निर्देशाने होमिओपॅथीचे जनक सर सेमीअल हॅनेमन यांच्या जयंती पर्वावर दहा दिवसीय वैद्यकीय प्रबोधन कार्यक्रम बुधवारपासून प्रारंभ झाला. हा कार्यक्रम दिनांक १० एप्रिल पर्यंत सुरू राहणार आहे. होमिओपॅथी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एस. एस. बुटे यांच्या अध्यक्षतेत आयोजित या प्रारंभ सोहळ्याला उद्घाटक म्हणून राष्ट्रीय होमिओपॅथीक संस्थान सदस्य, माजी केंद्रीय होमिओपॅथीक सदस्य डॉ.किशोर मालोकार, प्रमुख वक्ते डॉ.संदीप चव्हाण, होमिओपथीक एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ.जयप्रकाश जयस्वाल, कोषाध्यक्ष व्ही. एस. जानी, प्राचार्य डॉ. संजयकुमार तिवारी, संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.तिलकराज सरनायक उपस्थित होते.



सर हॅनेमन यांचे प्रतिमापूजन व मान्यवरांच्या स्वागताने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. तर डॉ.संदिप चव्हाण यांना प्राचार्य डॉ.तिवारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, तसेच डॉ.मालोकार यांना संस्थेचे अध्यक्ष डॉ.बुटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रमुख वक्ते डॉ.संदीप चव्हाण यांनी उपस्थित होमिओपॅथी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत वैद्यकीय व्यवसाय करीत असताना कोणत्या बाबींचे पालन करावे, याचे सांगोपांग विवेचन केले. वैद्यकीय जगतात सफल होमिओपॅथी तज्ञ होण्यासाठी अनेक बाबींची काळजी करावी लागते. सर्वप्रथम या क्षेत्रात सोशल इंजिनिअरिंग करून रुग्णांशी भावनिक नाते तयार करावे लागते. वैद्यकीय विश्व हे अत्यंत पवित्र क्षेत्र असून यामध्ये रुग्ण हा वैद्यकीय वर्गाला देवाची उपमा देतो. याची जाणीव ठेवून रुग्णांशी भावनिक नाते, नैतिकता, पारदर्शकता निर्माण करणे फार गरजेचे आहे. त्याचबरोबर रुग्णांच्या मनात विश्वास निर्माण करत असतांना व्यवसायात साधेपणा, स्पष्टता व निरंतरता आवश्यक असून रुग्णांची मानसिकता ही सर्वप्रथम तपासणीसाठी आवश्यक असल्याचे मत डॉ.संदिप चव्हाण यांनी व्यक्त केले. त्यांनी पॉवर पॉईंट द्वारे विवेचन करीत मार्गदर्शन केले. डॉ. किशोर मालोकार यांनीही नवनवीन प्रयोग आधुनिक विज्ञानाशी सुसंगत होऊन या पॅथीला बळकट करण्याचे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. बुटे यांनी या उपक्रमाची माहिती दिली. १० एप्रिल पर्यंत होमिओपॅथिक महाविद्यालयात चालणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने दि. २ एप्रिल ला मटेरिया मेडिका सेमिनार होणार असून यात डॉ.कल्पना धोटे आणि डॉ.उज्वला भटकर मार्गदर्शन करणार आहेत. दि ४ एप्रिल रोजी पेरीओडिक टेबल ऑफ होमिओपथी यावर डॉ.जे डी पाटील यांचे व्याख्यान, दि ६ एप्रिल ला ऑरगॅनॉन ऑफ मेडिसिनच्या संदर्भात विस्तृत मार्गदर्शन डॉ. भिसे मॅडम करून होमिओपॅथी मटेरिया मेडिकाच्या संदर्भात विस्तृत मार्गदर्शन डॉ. धांडे व डॉ मोनिका तराळे करणार आहेत. होमिओपॅथिक शिबीर आणि जागरूकता मोहीम यावर डॉ. शाकिब आणि डॉ.सचिन धर्माधिकारी हे व्याख्यान देणार आहेत. ७ एप्रिल रोजी डॉ.सॅम्युअल हॅनीमान यांच्या जीवनावर डॉ. कल्पना भिसे यांचे संबोधन, तर डॉ अरुण पंड्या यांचे केस प्रेझेन्टेशन विथ होमिओपथीक अप्रोच, डॉ.मिलिंद गद्रे हे होमिओपॅथिक फार्मसी संदर्भात विस्तृत मार्गदर्शन करणार आहेत. ८ एप्रिल रोजी डॉ. हेमलता लद्दड यांच्या नियंत्रणात सांस्कृतिक कार्यक्रम, अस्मिता देशमुख आणि डॉ. हर्षलता कोले यांच्या नियंत्रणात पोस्टर व क्वीज स्पर्धा, ९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नरेंद्र श्रीवास यांच्या नियंत्रणात योगा आणि क्रीडा स्पर्धा होणार आहे. १० एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता डॉ. रवी कुचर यांच्या उपस्थितीत सर सॅम्युअल हॅनेमन यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.

यात सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या डॉ. अस्मिता देशमुख, डॉ. हर्षलता कोले यांच्या समन्वयात आयोजित या कार्यक्रमाचे संचालन डॉ. स्वाती राठोड यांनी तर आभार डॉ. रुची चौरसिया यांनी मानले. यावेळी प्रा. डॉ. गद्रे, डॉ. कल्पना भिसे, डॉ चिंचोळकर, डॉ धांडे, डॉ. धर्माधिकारी, डॉ. देशपांडे, डॉ.श्रीवास, डॉ. प्रवीण महानकर, डॉ. डॉ. तराळे, डॉ.अपर्णा वाकोडे, डॉ. वैशाली डोसे, डॉ.सारडा, डॉ.माधुरी माने, डॉ. शाकिब, डॉ. मिश्रा समवेत विद्यार्थी व कॉलेजच्या अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## कानशिवनी येथे मोफत होमिओपॅथी औषधोपचार शिबिराचे आयोजन

**अकोला:** गोरक्षण व गोसंवर्धन कार्यात सक्रिय असणाऱ्या कानशिवणी येथील गोपालकृष्ण गोसेवा व अनुसंधान केंद्रात होमिओपॅथीचे जनक सर सॅम्युअल हॅनेमन यांच्या जयंतीनिमित्त व गुरुवर्य डॉ प्रफुल विजयकर यांच्या मार्गदर्शनात नागरिकांसाठी मोफत होमिओपॅथी औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता कानशिवणी येथील गोपालकृष्ण गोसेवा केंद्रात हे रुग्ण तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर होणार आहे. या शिबिरात ज्येष्ठ होमिओपॅथी तज्ञ डॉ संजय राऊत डॉ .शिल्पा राऊत समवेत डॉ तुषार माळोकार, डॉ.राधा स.पारसकर, डॉ अनुराग पांडे, डॉ प्रवीण बराडे, डॉ महेश म्हेसने, डॉ वंदना कासट, डॉ कल्याणी राऊत आदी तज्ञ रुग्ण तपासणी करून औषधोपचार प्रदान करणार आहेत. या मोफत होमिओपॅथी औषधोपचार शिबिरात आपले जुने रिपोर्ट् सोबत आणून पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गोपाळकृष्ण गोरक्षण व अनुसंधान केंद्र कानशिवनीच्या समस्त सेवाधारी वर्गाने केले आहे.

## रंगारंग झाला गीता नगर सखी मंडळाचा गणगौर उत्सव



**अकोला:** मातृशक्तीच्या सेवाकार्यात सक्रिय असलेल्या गीता नगर सखी मंडळाच्या वतीने रचना दीपक कोठारी यांच्या निवास प्रांगणात महिलांच्या सौभाग्याचे प्रतीक असलेला गणगौर गोठ उत्सव जल्लोषात साजरा केला. सुरुवातीला सर्व सखींनी ईसर-गणगौरची मनमोहक झांकी काढून सुख, समृद्धी आणि अखंड सौभाग्याची प्रार्थना केली. मनीषा वास्कर, शोभा गोळे आणि प्रीती हरणे यांनी तिलक लावून आणि पुष्पवृष्टी करून सर्व सख्यांचे जल्लोषात स्वागत केले. स्नेहल भूतडा आणि कोमल पनपालिया यांनी सर्वांना टेबल खेळ खेळवले. संचालन लक्ष्मी तिवारी व प्रेमा मिश्रा यांनी करून वातावरण रंगतदार केले. सरिता बंग यांनी सामूहिक खेळांद्वारे सख्यांना प्रफुल्लित केले तर कल्पना व्यास यांनी मुलांना विविध खेळ खेळवून त्यांचे मन जिंकले. उत्सवात सोळा श्रृंगार आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आली. सुहानी सिकरिया आणि सोनल सिंघानिया यांनी हाउजी खेळाचे आयोजन करून सर्वांना आनंद दिला.

## महानगरात सात दिवसीय योगशिबिर संपन्न

**अकोला:** राम मंदिर येथे रामनवमी व हनुमान जयंती पर्वावर सात दिवसीय योगशिबिर संपन्न झाले. हे शिबिर पतंजलि परिवार, श्री राम सेवा समिति, सिद्धिविनायक गणेश मंदिर ट्रस्ट तसेच हिमानी फाउंडेशन यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले।या शिबिरात पतंजलि योग समितीचे जिल्हा प्रभारी डॉ. सुहास काटे, महिला पतंजलि योग समितीच्या जिल्हा प्रभारी डॉ. स्वाती पोटे, भारत स्वाभिमान अध्यक्ष हरीश माखीजा, युवा भारत अकोला अध्यक्ष कपिल लाड, पतंजलि योग समिती सह-जिल्हा प्रभारी हरीश पारवानी, योगाचार्य डॉ. राजेश भोंडे, श्वेता बेलसर, डॉ. सुनीता कावरे, मनीषा भुसारी, यामिनी उपाध्याय, पार्वती निमकर्डे तसेच संजय लाड यांनी विनामूल्य योग प्रशिक्षण दिले.

## निधन वार्ता

### मंदोदरी लहरिया



**अकोला :** अकोला. डॉ. पंदेकृवितील प्रा. डॉ. कैलास लहरिया यांच्या मातोश्री श्रीमती मंदोदरी तुळशीराम लहरिया (८८) यांचे ३ एप्रिल रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, एक मुलगा व मोठा आप्त परिवार आहे.

# बोरगाव मंजू पोलिस ठाण्याच्या हद्दीत डिझेलचा अवैध साठा जप्त

### पुरवठा विभाग आणि एलसीबीची संयुक्त कारवाई

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला:** जिल्हा पुरवठा विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेने बोरगाव मंजू पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कुरणखेड जवळ मोठी कारवाई केली. या कारवाईत ७५० लिटर अवैध डिझेल जप्त करण्यात आले असून, यामुळे पेट्रोल आणि डिझेलचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

अकोला जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलची अवैध साठवणूक करू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाने केले होते. मात्र, गोपनीय



माहितीच्या आधारे जिल्हा पुरवठा विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेने कुरणखेड गावाजवळील टोल नाक्याजवळ छापा टाकला. या कारवाईत शेख मोहम्मद शेख इब्राहिम याच्याकडून ७५० लिटर अवैध डिझेलचा साठा जप्त करण्यात आला. या बेकायदेशीर साठवणुकीप्रकरणी बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यात कोणत्याही व्यक्तीने बेकायदेशीरपणे डिझेल किंवा पेट्रोलचा साठा केल्यास त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा पुरवठा विभागाने दिला आहे. ही धडक कारवाई जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र येन्नावार, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक शंकर शेळके, पुरवठा निरीक्षक विश्वजित लिंगायत, पोलीस उपनिरीक्षक बोडखे व कर्मचाऱ्यांच्या पथकाने यशस्वी केली.

## चैत्र मासात १७ नागरिक अयोध्येला रवाना

### भारतीय जनता पक्षातर्फे रामभक्तांचा सत्कार

प्रतिनिधी ४ एप्रिल

**हिवरखेड :** पवित्र चैत्र मासात हिवरखेड येथील ज्येष्ठ तब्बल १७ महिला , पुरुष हनुमान जयंतीच्या पवित्र दिवशी अयोध्या श्रीराम दर्शनासाठी रवाना झाले.

गेल्या वीस वर्षापेक्षा जास्त काळापासून बजरंग दलाचे सक्रियपणे काम करणारे दत्ता घरमोडे तसेच ज्ञानेश्वर तायडे, शशिकांत इंगळे, इंगळे आबा यांच्यासह १७ ज्येष्ठ नागरिक अयोध्येला श्रीरामाच्या दर्शनासाठी श्री हनुमान जयंतीच्या शुभ दिनी हिवरखेड गजानन महाराज मंदिर येथून रवाना झाले यामध्ये महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या या प्रवासात अयोध्येसह काशी व



प्रयागराज येथे सुद्धा सदर नागरिक दर्शनासाठी जाणार आहेत यावेळी या सर्वांचा प्रवास हा सुखकर जाओ अशा सदिच्छा हिवरखेड भारतीय जनता पार्टीच्या वतीने सर्वांना देण्यात आल्या तर सर्व प्रवाश्याचा हाराअर्पण करून सत्कार करण्यात आला यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी सरपंच संदीप इंगळे हिवरखेड नगर परिषदेच्या उपाध्यक्ष प्रतिभा येऊल, नगरपरिषदेच्या सभापती वंदना वानखडे गटनेत्या वैशाली वानखडे नगरसेविका दिपाली इंगळे नगरपरिषद सभापती वैभव गावंडे, नगरसेवक दीपक रायबोले राजेश वानखडे गुरुजी यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवकाळी पावसाचा कहर रब्बी पिकांचे नुकसान

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अडगाव :** १ एप्रिलला रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकिंचे झालेले नुकसाननिचे पंचनामे करुन नुकसानभरपाई मिळण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. १एप्रिला विजांच्या कडकडाट विजांच्या व वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे शेतातील गहु, कांदा, ज्वारी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसान पिकांचे त्वरित पंचनामे करुण नुकसानीचा



मोबदला मिळावा यासाठी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुका अध्यक्ष निलेश नेमाडे, गोपाल चांडक, अमोल मसुरकार, नकुल निमकर्डे, प्रविन निमकर्डे दिनेश गिऱ्हे, यांनी नायब तसिलदार ज्योती नारगुंडी यांना निवेदन दिले.

# सौंदळा येथील मरिमाय यात्रा उत्साहात साजरी

### भाविकांची प्रचंड उपस्थिती

प्रतिनिधी ४ एप्रिल

**हिवरखेड:** तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड वरून पाच किलोमीटर अंतरावरील सौंदाळा येथील मरी माय यात्रा सोहळा साजरा झाला. दोन दिवसांचा उत्सव असून हनुमान जयंतीच्या दिवशी चैत्र पौर्णिमेला सुरुवात होते. पहिल्या दिवशी शेगडीची मिरवणूक निघते व दुसऱ्या दिवशी सकाळी काकडा व सात वाजता देवीची आरती होते.

नंतर या ठिकाणी रिंगणीच्या



काटीवर लोटांगण व नाळे टोचणे, गाडा ओढणे आणि महाप्रसाद असतो. गावकरी मिळून भव्य आयोजन केल्या जाते. या मंदिरावरील अनिष्ट प्रथा बंद करून महाप्रसाद सुरू करण्यात आला. आजूबाजूच्या खेड्यापाड्याचे लोक देवी दर्शनाकरिता येतात. मरीमायला नवस बोलतात. देवीसमोर बोललेला नवस पूर्ण करण्याकरिता भाविक भक्त येतात. अशी अनोखी सौंदळा देवी यात्रा परंपरा जपून आहे. भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दोन दिवसांच्या यात्रेसाठी भाविकांची श्रद्धा पाहायला मिळते. अगदी वाजतगाजत भाविक येतात आणि मातेपुढे नतमस्तक होतात.


# भीमा तुझ्या जन्मामुळे महानाट्याला भीमसैनिकांचा प्रचंड प्रतिसाद

### विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा सन्मान

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोट :** छत्रपती शिवबा प्रतिष्ठान, युवा प्रतिष्ठान व सम्यकदृष्टी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भीमा तुझ्या जन्मामुळे महानाट्य अकोट स्थानिक श्री सरस्वती महाविद्यायात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अकोट शहर व ग्रामीण भागातून हजारो भीमसैनिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

पुणे येथील जय हो एंटरप्राइजेस प्रस्तुत व प्रा. प्रकाशकुमार वाघमारे निर्मित भीमा तुझ्या जन्मामुळे या महानाट्यमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण जीवन परिचय महानाट्याच्या स्वरूपात सादर करण्यात आला. तसेच अँड संतोष गजानन खवले निर्मित मराठी चित्रपट भीमा तुझ्या जन्मामुळे या चित्रपटाचे शीर्षक गीत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळेस प्रदर्शित करण्यात आले. त्यानंतर एड संतोष खवले



यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात फुले शाहू आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचवा असा मोलाचा संदेश दिला. तसेच अकोट शहर व ग्रामीण भागातून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, पत्रकारिता, औद्योगिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तुत्वान नागरिकांचा ड समाजभूषण जीवनगौरव पुरस्कार, युवा उद्योजक जीवनगौरव पुरस्कार, व कला भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यामध्ये प्रा. विलास तायडे, प्रकाश गायकी, पवन बेलसरे, स्वप्निल सरकटे, दीपक रेडे, संभाजी थोरात, प्रज्वल डोंगरदिवे, अतुल अढाऊ, प्रा. प्रशांत सावळे, अजय घनबहादूर, लखन इंगळे, मंगला वानखडे, रोशन नितोने, आशिष वानखडे, सुशीला पचांग, सुनिता वानखडे यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश चिखले तर स्वागताध्यक्ष एड संतोष खवले तर कार्यक्रमाचे आयोजक निखिल वानखडे, वंश दांदळे वैभव जगताप हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे , जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, दीपक गोरे, कारंजा येथून आलेले शेषराव चव्हाण, कटके सर सौ स्वातीताई चिखले ,सौ अमृताताई खवले, आशिष रायबोले, अभिनेता श्रीवेश देशमुख, अभिनेता गौरव धांडे, अभिनेता उमेश गारोळे, अभिनेता अविनाश नाटेकर, अभिनेत्री स्टेफी प्यारेजी, अभिनेता सुशील ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच नाळ व नाळ २ या चित्रपटासाठी राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चेत्या म्हणजेच श्रीनिवास पोकळे यांची प्रमुख उपस्थिती हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.अपेक्षाताई अवंडकर, प्रवीण इंगळे, मनोज देशमुख, पंकज जयस्वाल, स्वप्नील बोबडे, रेखा शिरसाठ, कामिनी बोडके, कविताताई कानेरकर, वंश दांदळे, महेश वाघमारे, सागर वाघमारे, संतोष निमकर, राजेश हाडोळे, शिवराज हाडोळे, सागर तायडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गायके यांनी तर प्रास्ताविक अॅड. संतोष खवले यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रवीण बोंद्रे यांनी केले.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये केजीटूच्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत सोहळा

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये केजी टू च्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत सोहळा उत्साहात पार पडला. प्रमुख अतिथी मनोज लोणारकर वि. अधिकारी, तहसीलदार सुनील चव्हाण, संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरण डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, शाळेचे प्रा.द्वारिका प्रसाद बसेर, डॉ. कविता मिश्रा व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. वर्ग सातवी चा विद्यार्थी पार्थ ओझा याने स्कूल प्लेज चे वाचन उपस्थित असलेल्या सर्वांकडून करून घेतले प्रवीण कुलट व रुपाली कुटे यांनी स्वागत गीत सादर केले. यानंतर केजी टू च्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम भाषणे सादर केली. सिद्धार्थ अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली केजी टू च्या



विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर रित्या आपल्या नृत्यातून शिक्षकांविषयी प्रेम व कृतज्ञता व्यक्त केली. केजी टू च्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी व मेडल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

शाळेचे डॉ. कविता मिश्रा यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्यातील गुणांचे नावीन्य पालकांना सांगितले. विद्यार्थी जीवनात अभ्यासच नाही तर इतर कला कौशल्यांकडे सुद्धा लक्ष देण्याचे व मुलांना प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. त्यानंतर शाळेचे प्राचार्य यांनी केजी टू च्या विद्यार्थ्यांचे त्यांनी दिलेल्या गोड भाषणांची कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मनोज लोणारकर यांनी विद्यार्थ्यांच्या भाषणांची व त्यांनी केलेल्या नृत्याचे कौतुक केले विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर दीपम लखोटिया यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कलागुणांचे विकास करण्यासाठी व विद्यार्थ्यांना समाजातील योग्य व्यक्ती म्हणून घडवण्यासाठी शिक्षकांचे आभार व्यक्त केले व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे नवनीत लखोटिया यांनी लहान मुलांचं दीक्षांत समारंभ म्हणजे काय व त्याचे महत्त्व आपल्या भाषणातून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रुचि काळे व कविता राऊत यांनी केले.


# भास्कर महाराज पुण्यतिथी महोत्सव ७ एप्रिलला

### महोत्सवात ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोट:** अकोट हिवरखेड मार्गावरील श्री गजानन महाराज संस्थान शेगावची शाखा असलेल्या श्री भास्कर महाराज समाधी स्थळ अडगाव बु. येथे श्री संत गजानन महाराजांचे पट्टशिष्य श्री संत भास्कर महाराज यांचा ११९ वा पुण्यतिथी महोत्सव दि.३१ मार्च ते ७ एप्रिल पर्यंत संपन्न होत आहे.

त्यानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह महोत्सव आयोजित केलेला असून, या सप्ताहामध्ये, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन, प्रवचन, काकडा, हरिपाठ



इत्यादी कार्यक्रम संपन्न होत आहेत. श्री भास्कर महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त मंगळवार ७ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता श्री भास्कर महाराज यांच्या पालखीची श्रीक्षेत्र परिक्रमा होणार आहे. या क्षेत्र परिक्रमेत, श्रींच्या पालखी सोबतच या उत्सवाकरिता बाहेरगाव वरून आलेल्या सर्व दिंड्या व पालख्या सुद्धा सहभागी होणार आहेत. त्यानंतर सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्री भास्कर महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त काल्याचे किर्तन श्री ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज गावंडे यांचे होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. भक्तांनी या श्री सेवा पर्वणीचा अवश्य लाभ घ्यावा.

#### श्रींनीच सुरू केलेला उत्सव

श्री गजानन महाराज आपले पट्टशिष्य श्री भास्कर महाराज यांचे सह हनुमान जयंतीच्या उत्सवाकरीता अडगाव येथे आले असता, श्रीक्षेत्र भास्कर नगर येथे श्री भास्कर महाराजांना २ मे १९०७ रोजी स्वहस्ते समाधी दिली होती. फार मोठा उत्सव संपन्न होऊन त्यांनी याच ठिकाणी कावळयांचे निवारण केले होते. श्री भास्कर महाराजांना समाधी दिल्यानंतर श्री गजानन महाराज याच ठिकाणी १४ दिवस मुक्कामाला राहिले होते. त्यांनीच हा सुरू केलेला उत्सव आहे. त्यामुळे या उत्सवाला एक वेगळेच महत्त्व आहे. स्वतः श्री गजानन महाराजांनी श्री भास्कर महाराज यांचे सन १९०७ ते १९१० पर्यंत चार पुण्यतिथी उत्सव स्वतः या ठिकाणी येऊन साजरे केले होते. या समाधी सोहळयाचे वर्णन गजानन विजय ग्रंथाच्या अकराव्या अध्यायात आलेले आहे . .


समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार

माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# जबरी चोरीचा पर्दाफाश; चार आरोपींना अटक

प्रतिनिधी ४ एप्रिल



**यवतमाळ :** लोहारा पोलिसांनी 22 लाख रुपयांच्या जबरी चोरीचा मोठा पर्दाफाश केला आहे.पोलिसांनी कारंजा आणि वाशीम येथून सापळा रचून चार आरोपींना ताब्यात घेतले. या आरोपींनी एम.आय.डी.सी. लोहारा येथील शासकीय गोडावुन समोरून 250 क्विंटल तुरीचे 500 पोते चोरी करून लांबवले होते.

कलीमोद्दीन ख्याजा मिराज उद्दीन (वय 26, रा. नुर नगर, दारव्हा रोड, कारंजा, जि. वाशीम) मोहम्मद अक्रम मोहम्मद सलीम बाळापुरे (वय 35, रा. कोळी ता. कारंजा, जि. वाशीम) सलीमोद्दीन कलीमोद्दीन (वय 39, रा. हातगाव, ता. मुर्तीजापुर, जि. अकोला) ईम्राण हसन अब्दुल हसन (वय 25, रा. नुर नगर, दारव्हा रोड, कारंजा, जि. वाशीम) अशी आरोपींची नावे आहे. चोरीची घटना 26 मार्च 2026 रोजी रात्री 9:30 वाजता घडली, ज्या वेळी ड्रायव्हर शुभम सतिष मोरे (वय 19, रा. कवठळ ता. मंगळुर पीर, जि. वाशीम) हे ट्रक क्र. MH34-BZ-2714 घेऊन गोडावुन समोर उभे होते. तेव्हा दोन अनोळखी व्यक्तींनी त्याला चाकूचा धाक दाखवून ट्रक लुटला आणि त्यात लोड केलेले 250 क्विंटल तुरीचे 500 पोते, जि. 22 लाख रुपये किंमतीचे होते, त्याच्यावर चाकूचा धाक दाखवून ट्रक घेऊन निघून गेले. फिर्यादी प्रमोद भाऊराव नवरंगे (वय 45, रा. पांढरकवडा) यांच्या तक्रारीवरून लोहारा पोलिसांनी गुन्हा नोंदवला आणि तपास सुरू केला. तपास पथकाने गोपनीय माहिती मिळवून कारंजा वाशीम येथे सापळा रचून चार आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींमध्ये – कलीमोद्दीन ख्याजा मिराज उद्दीन (वय 26, रा. नुर नगर, दारव्हा रोड, कारंजा, जि. वाशीम) मोहम्मद अक्रम मोहम्मद सलीम बाळापुरे (वय 35, रा. कोळी ता. कारंजा, जि. वाशीम) सलीमोद्दीन कलीमोद्दीन (वय 39, रा. हातगाव, ता. मुर्तीजापुर, जि. अकोला) ईम्राण हसन अब्दुल हसन (वय 25, रा. नुर नगर, दारव्हा रोड, कारंजा, जि. वाशीम) यांनी चोरीची कबुली दिली. तपासादरम्यान, आरोपींच्या ताब्यातून 234 क्विंटल तुरीचे पोते जप्त करण्यात आले, ज्याची किंमत 20,59,200 आहे. तपास पथकात पोलीस स्टेशन लोहारा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहीत चौधरी, पोउपनि गजानन अजमीर, पोलीस अंमलदार अमोल अन्नेरवार, पवन चिरडे, बबलु पठान, प्रशांत राठोड, नकुल रोडे, कल्पेश रामटेके, रितेश मस्के, विजय कबले यांचा समावेश होता. या कार्याची कामगिरी यवतमाळ जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधिक्षक रॉबीन बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाली. आरोपींना अटक करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

# उसाच्या थकीत देयकांसाठी शेतकऱ्यांचा संताप; कारखान्यासमोर बेमुदत उपोषण सुरु

प्रतिनिधी ४ एप्रिल



**उमरखेड :** वसंत सहकारी साखर कारखान्याकडून उसाचे थकीत 'केन पेमेंट' न मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला असून, शेतकरी नेते चितांगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली आजपासून कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे जानेवारी महिन्यापासूनचे देयक अद्याप अदा झालेले नाही. सध्या हा कारखाना भैरवनाथ शुगर फॅक्टरीकडून भाडेतत्त्वावर चालवला जात असला, तरी १ जानेवारीपासून गाळप झालेल्या उसाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेले नाहीत. नियमानुसार १४ दिवसांत पेमेंट देणे बंधनकारक असतानाही अनेक महिने उलटून गेले आहेत. या पार्श्वभूमीवर चितांगराव कदम यांनी ३१ मार्चपर्यंत देयके अदा न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने दखल न घेतल्याने त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला.

उपोषणादरम्यान बोलताना कदम म्हणाले, "शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले आहे. शासनाच्या नियमांची पायमल्ली करून कारखान्याने शेतकऱ्यांचे पैसे अडवून ठेवले आहेत. जोपर्यंत थकीत रक्कम मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील."

दरम्यान, या आंदोलनाला परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळत असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# पुसदमध्ये वीज कोसळून शेतकरी महिलेचा मृत्यू

## कुंभारी शिवारात हृदयद्रावक घटना; ग्रामस्थांच्या मदतीने पतीचा जीव वाचला

प्रतिनिधी ४ एप्रिल



**पुसद :** जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून विविध भागामध्ये अवकाळी पावसाचा कहर सुरू आहे. पुसद तालुक्यातही पाऊस सुरू आहे. त्यातच शेतामध्ये कापूस वेचत असलेल्या शेतकरी दाम्पत्यावर वीज कोसळली. यामध्ये पत्नीचा घटनास्थळीच मृत्यु झाला तर पती गंभीर जखमी झाले आहे. ही घटना शुक्रवारी ३ एप्रिलला सायंकाळी तालुक्यातील कुंभारी शेत शिवारामध्ये घडली.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खंडाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पुसद तालुक्यातील कुंभारी येथील हनुमान नगर परिसरात ही हृदयद्रावक घटना घडली. कुंभारी येथे माळावरील शेतशिवारात रोहिदास हरी पवार वय ५५ व पत्नी सुमनबाई वय ५० हे शेतात कापूस वेचणी करीत होते. अशात सायंकाळी ४ वाजताच्या दरम्यान पाऊस सुरू झाला. यामध्ये अचानक वीज पडली त्यामध्ये सुमनबाई पवार यांचा जागीच मृत्यू झाला असून, रोहिदास पवार हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांच्यावर पुसद येथे उपचार सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व जखमी रोहिदास पवार यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे त्यांचा जीव वाचल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात असून, शेतकरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रशासनाने अशा नैसर्गिक आपत्तीपासून बचावासाठी जनजागृती व आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

राळेगाव तालुक्यात अवकाळी पाऊस हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार गेल्या काही दिवसांपासुन जिल्ह्यात विवध भागामध्ये अवकाळी पाऊस बरसत आहे. त्यातच शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी राळेगाव तालुक्यात काही भागामध्ये जोरदार पावसाने हजेरी लावली होती. या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या पावसाने काही भागात शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# मेंढोली-पिंपरी (कायर) मार्गासाठी आमरण उपोषण सुरू

प्रतिनिधी ४ एप्रिल




**वणी :** मेंढोली ते पिंपरी (कायर) या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या बांधकामाचा प्रश्न तब्बल सहा वर्षांपासून प्रलंबित असून, प्रशासनाच्या दिरंगाई व हलगर्जीपणाविरोधात आता नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. जंगल परिसरातील अपूर्ण ६०० मीटर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मनोज काळे यांनी ग्रामस्थ, शेतकरी व नागरिकांसह ३ एप्रिल, गुड फ्रायडेपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

मेंढोली ते पिंपरी (कायर) या सुमारे ४ किलोमीटरच्या रस्त्यास २०१८-१९ मध्ये शासनाची मंजुरी मिळाली होती. खनिज विकास निधीतून ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभाग, वणी यांच्या मार्फत ठेकेदार वैभव जिद्देवार यांना काम देण्यात आले आणि प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली. मात्र वनविभागाच्या हद्दीत येणाऱ्या ६०० मीटर रस्त्याच्या कामावरच अडथळे उभे राहिले.

वनविभागाने २०२० मध्ये त्रुटी दर्शवणारे पत्र दिल्यानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक पूर्तता केली नाही. परिणामी मंजूर निधी परत गेला आणि जंगलातील रस्ता आजही अपूर्ण अवस्थेतच आहे. विशेष म्हणजे संबंधित विभागाकडून "काम पूर्ण झाले, निधी खर्च झाला" असा दावा केला जात असल्याने संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे.

"फक्त माती कामासाठी ५० लाख खर्च होणे शक्य नाही, या कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे," असा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे. अपूर्ण रस्ता, परत गेलेला निधी आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे संतप्त नागरिकांनी आता थेट आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. वन परिसरात सुरू असलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने ग्रामस्थ, शेतकरी व नागरिक सहभागी झाले असून, "रस्ता पूर्ण झाला पाहिजे, अन्यथा आंदोलन तीव्र होईल," असा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार का, की हा रस्ता अजूनही फाईलमध्येच अडकून राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गॅस सिलेंडर टंचाई; वंचितचे ६ एप्रिलला आंदोलन

प्रतिनिधी ४ एप्रिल

**घाटंजी :** गॅस सिलेंडर टंचाई आणि पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांचा निषेध करत, "नरेंद्र... कब मिलेगा गॅस सिलेंडर?" या घोषणेसह ६ एप्रिल रोजी राज्यस्तरीय आंदोलन पुकारण्यात आले आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुका कार्यकारिणी, शहर कार्यकारिणी, महिला आघाडी, युवा आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलन तसेच फुले-आंबेडकर विद्वत सभेच्या पदाधिकाऱ्यांना या आंदोलनात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, घाटंजी येथे हे आंदोलन होणार आहे. संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे की, गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक, गृहिणी, मध्यमवर्गीय कुटुंबे, छोटे व्यावसायिक, फूड स्टॉल चालक, कॅटरिंग व्यावसायिक, ऑटोरिक्षा चालक तसेच विद्यार्थी यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. घरगुती गॅस सिलेंडर मिळणे कठीण झाले असून, जीवनावश्यक खर्चावर मोठा ताण पडत आहे. याउलट, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून पंतप्रधान निवडणूक प्रचारात व्यस्त असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी हे आंदोलन महत्त्वाचे ठरणार असल्याचे मत संघटनेचे तालुकाध्यक्ष संघपाल कांबळे यांनी व्यक्त केले आहे.

# वृद्ध आईला मुलगा व सुनेने दरमहा १५ हजार रुपये खाऊटी द्यावी

## पुसद न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

प्रतिनिधी ४ एप्रिल

**पुसद :** तालुक्यातील कन्हेरवाडी येथील लक्ष्मीबाई माघाडे यांनी आपल्या मुलगा आणि सुने विरोधात पुसद न्यायालयात खाऊटी रकमेसाठी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

न्यायालयाने मुलगा आणि सुनेला दरमहा १५,००० रुपये खाऊटी देण्याचे आदेश दिले आहेत.

लक्ष्मीबाई यांचे आरोप होते की, त्यांचा मुलगा तुकाराम माघाडे आणि सुन त्यांचे पालनपोषण करत नाही, त्यामुळे त्या आपल्या मुला आणि सुनेकडून आर्थिक मदतीसाठी न्यायालयात गेल्या होत्या. पुसद येथील वि. ४ थे न्याय दंडाधिकारी प्र. श्रे. अमिता यु यादव यांच्या न्यायालयाने लक्ष्मीबाई यांना न्याय देत, मुलगा आणि सुनेला आदेश दिला की, ते केस दाखल होण्याच्या तारखेपासून दरमहा १५,००० रुपये खाऊटी म्हणून देय असलेली रक्कम नियमितपणे द्यावी.

या निर्णयामुळे वृद्ध आई वडिलांसाठी एक महत्त्वाचा मार्गदर्शक ठरेल. जर मुलगा किंवा सून पालनपोषण करत नसेल, तर न्यायालय या संदर्भात कठोर निर्णय देऊन पालकांचे अधिकार सुरक्षित करण्याचा संदेश देत आहे. लक्ष्मीबाई माघाडे यांच्या वतीने त्यांच्या वकील ॲड. शाहेद शेख यांनी न्यायालयात प्रकरण सक्षमपणे मांडले.

# पांदण रस्ते योजनेला वेग; पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे लक्ष्य

प्रतिनिधी ४ एप्रिल




**आर्णी :** शेतकऱ्यांच्या दळणवळणासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या "मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ता योजने"च्या कामांना गती देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. यासंदर्भात तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या समन्वयातून कामे जलदगतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस समितीचे अध्यक्ष आमदार राजू तोडसाम, उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे, तहसीलदार वैशाख वाहूरवघ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये पंचायत समिती, पोलीस विभाग, कृषी, वन, लघु पाटबंधारे तसेच बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग होता.

तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांचा आढावा घेताना अनेक कामे प्रलंबित असल्याचे समोर आले. शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी सुलभ मार्ग उपलब्ध व्हावा तसेच शेतीमालाची वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी या रस्त्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

आमदार राजू तोडसाम यांनी सर्व विभागांनी जबाबदारीने काम करत वेळेत कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपविभागीय अधिकारी गोपाल देशपांडे यांनी दर्जेदार कामांवर भर देत तांत्रिक अडचणी तत्काळ सोडवण्याच्या सूचना केल्या.

बैठकीत जमीन उपलब्धता, तांत्रिक मंजुरी, निधीचा वापर आणि स्थानिक समन्वय या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

संबंधित विभागांनी या अडचणी दूर करून कामांना गती देण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, तालुक्यातील सर्व रस्त्यांचे सुमारे २५ किलोमीटरचे क्लस्टर तयार करून टप्प्याटप्प्याने मातीकाम, खडीकरण आणि डांबरीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण तालुक्यात रस्ते विकासाला गती मिळणार आहे.

यासोबतच पाणीटंचाई, एसआयआर आढावा आणि सीएफआर वन विभागाशी संबंधित बाबींचाही आढावा घेण्यात आला. एकूणच, या बैठकीमुळे आर्णी तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या विकासाला नवी चालना मिळणार असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वीज कोसळून महिलेचा मृत्यू; एक जखमी

प्रतिनिधी ४ एप्रिल

**पुसद :** तालुक्यातील शेतात काम सुरू असताना अचानक वीज कोसळून एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून, या घटनेत एक जण जखमी झाला आहे.

तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार, सुमन रोहिदास पवार (वय ५०) या सायंकाळच्या सुमारास शेतात काम करीत असताना अचानक वीज कोसळल्याने जागीच मृत्यू झाला. या घटनेत रोहिदास हरी पवार (वय ५६, रा. हनुमान नगर) हे जखमी झाले आहेत.

जखमी रोहिदास पवार यांच्यावर पुसद येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती लक्षात घेऊन वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# दर्जेदार व टिकाऊ रस्त्यांवर भर; कामात त्रुटी चालणार नाहीत : आमदार वानखेडे

प्रतिनिधी ४ एप्रिल



**उमरखेड :** हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल (HAM) अंतर्गत सुरू असलेल्या रस्ते प्रकल्पांची पाहणी करताना आमदार किसनराव वानखेडे यांनी कामांच्या गुणवत्तेबाबत कठोर भूमिका घेतली.

उमरखेड–हरदडा तसेच विडूळ–साखरा–देवसरी मार्गांवरील कामे दर्जेदार, टिकाऊ आणि तांत्रिकदृष्ट्या अचूक पद्धतीने पूर्ण व्हावीत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

विधानसभा मतदारसंघातील 51 C (पुसद–उमरखेड–हरदडा) आणि 51 D (विडूळ–साखरा–देवसरी) या महत्त्वपूर्ण रस्ते प्रकल्पांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी कामांच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण ठेवण्यावर त्यांनी विशेष भर दिला. रस्त्यांचे काम दीर्घकाळ टिकावे, यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गावांतर्गत रस्त्यांची सद्यस्थिती लक्षात घेता, त्यांचे रुंदीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे स्थानिक नागरिकांना सुरक्षित व सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. उमरखेड शहरातील सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचीदेखील पाहणी करून, ती कामे निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.

शहरातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, मध्यभागी डिव्हायडर उभारणी तसेच रस्त्यांचे सौंदर्यीकरण यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या उपाययोजनांमुळे शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होऊन नागरिकांना अधिक सुरक्षित व आधुनिक सुविधा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पाहणीदरम्यान अधीक्षक अभियंता पागृत, कार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांच्यासह प्रकाश इंगोले, राजेंद्र क्षीरसागर, कपिल प्रसाद, राकेश रंजन, बालाजी वानखेडे, श्रीधर देवसरकर, परमानंद कदम आणि जी.एन.आय.चे संजय मानापुरे उपस्थित होते.

# तळणी फाट्यावर १६ वर्षांपासून पाणपोई सेवा

प्रतिनिधी ४ एप्रिल




**आर्णी :** तळणी (कु-हा) फाट्यावर १६ वर्षांपासून सुरू असलेली पाणपोई सेवा यंदाही उत्साहात सुरू करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या कडाक्यात प्रवाशांना आणि स्थानिक नागरिकांना दिलासा देणारी ही सेवा गावासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. तळणी चौफुली हे अनेक गावांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र आहे, जिथून प्रवाशांना आणि स्थानिकांना पाणी मिळवण्यासाठी थांबावे लागते.

गेल्या १६ वर्षांपासून पाणपोई सेवा सुरू असून, यंदाही ती सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरली आहे. या ठिकाणी विशेषतः उन्हाळ्यात आणि लग्नसराईच्या हंगामात मोठ्या प्रमाणात लोकांची वर्दळ असते. घाटंजी ते आर्णी आणि यवतमाळ ते सदोबा सावळी या मार्गावर तळणी चौफुली एक महत्त्वाचे प्रवासी केंद्र आहे. या ठिकाणी ये-जा करणारे प्रवासी पाणी पीत आपली तहान भागवत आहेत.

वाढत्या तापमानामुळे नागरिकांची त्रासदायक स्थिती असताना, मातीच्या माठांतील थंड पाणी प्रदान करण्याची सोय उपलब्ध करून देत तळणी फाट्यावर सुरू असलेली पाणपोई सेवा खूपच महत्त्वाची ठरली आहे. या सेवेमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे आणि समाजातील सकारात्मक बदलांसाठी एक आदर्श निर्माण झाला आहे.

गेल्या १६ वर्षांपासून स्वखर्चाने ही सेवा सुरू करणारे राष्ट्रवादी काँग्रेस आर्णी तालुकाध्यक्ष सुनिल पोतगंटवार यांचे कार्य खूपच प्रशंसनीय आहे. त्यांनी पाणपोई सेवा, पक्षी पाणी, पोळी आणि लग्नप्रसंगी मोफत पाणी देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

त्यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे परिसरातील नागरिक त्यांचे कौतुक करत आहेत.

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## अपघातमुक्त अमरावतीकडे वाटचाल : आरटीओच्या 'रस्ता सुरक्षा रथा'द्वारे व्यापक जनजागृती

**अमरावती :** राज्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी परिवहन विभागामार्फत रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत 'रस्ता सुरक्षा रथ' ही विशेष जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या वतीने सुसज्ज व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असा रस्ता सुरक्षा रथ तयार करण्यात आला आहे. या रथाचे उद्घाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले तसेच त्यांनी रथाला हिरवी झेंडी दाखवून जनजागृती मोहिमेची औपचारिक सुरुवात केली. यावेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक मेहरकर, मोटार वाहन निरीक्षक संजय पेंढारकर, जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक दीक्षा आढाव, अंकिता सराफ, श्रुतिका गोपीवार, अक्षय राठोड, अभिजीत गावंडे, पराग जाधव तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# प्रशासकीय गतिमानता, कार्यक्षमतेत होणार वृद्धी!

## ◆ अमरावती विभागात 'महा-साधना सप्ताह' - विभागीय आयुक्त नयना गुंडे

प्रतिनिधी ४ एप्रिल



**अमरावती:** केंद्र शासनाचा क्षमता विकास आयोग (CBC) आणि 'कर्मयोगी भारत' यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ८ एप्रिल, २०२६ या कालावधीत देशभरात 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यभर 'महा-साधना सप्ताह' उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे ठरवले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या अंगभूत कर्मक्षमतेचा विकास व्हावा आणि त्यांच्या निरंतर ज्ञानसंवर्धनातून प्रशासकीय कार्यात गुणात्मक वाढ व्हावी, हा या सप्ताहाचा मुख्य हेतू आहे. यानुषंगाने विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'महा-साधना सप्ताहात' सक्रियरित्या सहभाग नोंदवून 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर उपलब्ध असलेले विविध अभ्यासक्रम पूर्ण करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या सप्ताहाअंतर्गत अमरावती विभागातील सर्व शासकीय, निमशासकीय विभागांच्या अधिनस्त कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर उपलब्ध असलेले विविध अभ्यासक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. हे अभ्यासक्रम देशातील नामांकित संस्थांकडून तयार करण्यात आले असून ते विनामूल्य उपलब्ध आहेत. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर नोंदणी करुन उपरोक्त कालावधीत (दि.२ ते ८ एप्रिल २०२६) किमान ४ तासांचे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे.

या प्रशिक्षणांमुळे प्रशासनात तंत्रज्ञान (Technology), परंपरा (Tradition) आणि दृश्यमान परिणाम (Tangible Outcomes) या त्रिसूत्रीचा प्रभावी अवलंब होईल. प्रत्येक शासकीय विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी पूर्ण केलेल्या प्रशिक्षणांचा विभागीय आयुक्तांनाकडून आढावा घेण्यात येणार आहे. विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या व्यावसायिक क्षमतेचा आणि ज्ञानाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनाव्दारे आयोजित या 'महा-साधना सप्ताहात' उत्स्फुतपणे सहभाग घेऊन प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांनी केले आहे.

# सायंकाळी विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस, वातावरणात गारवा

प्रतिनिधी ४ एप्रिल



**अमरावती:** दिवसभर तापत्या उन्हामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असताना सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात मोठा बदल झाला. विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शहरासह परिसरात गारवा निर्माण झाला.


या अनपेक्षित बदलामुळे काही काळ नागरिकांना दिलासा मिळाला असला, तरी वलीत भागातील शेतकरी वर्गासाठी ही स्थिती चिंताजनक ठरत आहे.

सकाळपासूनच वाढलेल्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले होते. अंगावर तडाखेबाज उन्हाचा मारा होत असल्याने रस्त्यांवर वर्दळही कमी झाली होती. मात्र सायंकाळी अचानक ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे वातावरणात आल्हाददायक गारवा पसरला. दरम्यान, या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः काढणीच्या अवस्थेत असलेल्या पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गहू, हरभरा तसेच फळबागांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

अकाली पावसाचे हे सत्र पुढेही सुरू राहिल्यास शेती उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

# खारी गावात मध्यरात्री आगीचे भीषण तांडव; चार कुटुंबांचा संसार राख

प्रतिनिधी ४ एप्रिल



**धारणी :** धारणीपासून सुमारे १२ किमी अंतरावर असलेल्या खारी गावात मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत चार घरे पूर्णपणे जळून खाक झाली. या दुर्घटनेत अंजन सुरेज घुले, शैलेश घुले, युवराज प्रकाश धुर्वे आणि हंसराज प्रकाश धुर्वे यांच्या घरांची अक्षरशः राखरांगोळी झाली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून संबंधित कुटुंबे उघड्यावर आली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेदहाच्या सुमारास गावातील नागरिक झोपण्याच्या तयारीत असताना अचानक एका घराला आग लागली. काही क्षणातच आगीने भीषण रूप धारण करत शेजारील घरांनाही विळखा घातला. आगीच्या ज्वाळा इतक्या वेगाने पसरल्या की, ग्रामस्थांमध्ये एकच खळबळ उडाली आणि धावपळ सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच धारणी नगर पंचायतीचे अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तसेच खारी ग्रामपंचायतीकडून पाण्याचा टँकरही त्वरित पाठविण्यात आला. गावकरी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत पाण्याचा मारा करून अखेर आगीवर नियंत्रण मिळवले.

या आगीत संबंधित कुटुंबांच्या घरातील साठवलेले धान्य, संसारोपयोगी भांडी, कपडे आणि इतर साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे पीडित कुटुंबांवर मोठा आघात झाला असून त्यांच्या डोक्यावरचे छप्परही नाहीसे झाले आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

**मदतीसाठी धावली यंत्रणा**

आगीची तीव्रता लक्षात घेता खारी ग्रामपंचायतीने त्वरित पाण्याचा टँकर उपलब्ध करून दिला, तर नगर पंचायतीच्या अग्निशमन दलाने तत्परतेने कारवाई करत आग आटोक्यात आणली. वेळेत मदत पोहोचल्यामुळे मोठी जीवितहानी टळली, अन्यथा संपूर्ण वस्ती आगीच्या विळख्यात सापडली असती.

# श्री शिवाजी हायस्कूल, भामोद येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

प्रतिनिधी ४ एप्रिल




**भामोद:** बदलत्या काळाच्या ओघात विखुरलेली पाखरे जेव्हा पुन्हा आपल्या जुन्या घरट्यात म्हणजे शाळेत एकत्र येतात, तेव्हा तो सोहळा केवळ भेटीगाठींचा न राहता भावनांचा एक महाकुंभ ठरतो. असाच एक अविस्मरणीय आणि नियोजनबद्ध माजी विद्यार्थी मेळावा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल, भामोद येथे पार पडला. सन १९९५-९६ च्या इयत्ता १० वीच्या बॅचमधील ५० विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या शालेय स्मृतींना उजाळा दिला.

मित्रांनो, १९९५... काय तो काळ होता, नाही? ना हातात मोबाईल होता, ना व्हॉट्स?प, ना इन्स्टाग्राम. आपली सोशल नेटवर्किंग साइट म्हणजे शाळेचं मैदान आणि आपलं चॅटिंग म्हणजे लास्ट बेंचवरच्या कुजबुजणाऱ्या गप्पा!

आज इतक्या वर्षांनी एकत्र आल्यावर तो काळ पुन्हा एकदा जिवंत झाल्यासारखा वाटतोय. शाळेचे ते दिवस, तोच वर्ग आणि तेच गुरुवय...'३० वर्षांनंतर जेव्हा हा योग जुळून आला, तेव्हा भामोदचे श्री शिवाजी हायस्कूल भावूक क्षणांचे साक्षीदार ठरले. हॉलमध्ये तत्कालीन वर्गशिक्षक कळसकर यांनी प्रवेश केला, तसे सर्व ५० माजी विद्यार्थ्यांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात आणि फुलांचा वर्षाव करत त्यांचे शाही स्वागत केले. आपल्या गुरुप्रती असलेला हा आदर पाहून उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले.

सोमवारी सकाळी १० वाजेपासूनच माजी विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात उपस्थिती लावली होती. सकाळी ११ वाजता राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विशेष म्हणजे, ३० वर्षांनंतर हे सर्व विद्यार्थी पुन्हा त्याच वर्गातील बाकांवर बसले. तत्कालीन वर्गशिक्षक श्री. कळसकर सर यांनी पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची हजेरी घेतली आणि प्रत्येकाचा परिचय करून घेतला. हा क्षण सर्व उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणणारा ठरला.

# डिग्रीसोबत मिळवा किमान कौशल्य विकासाची जोड-आ.सुलभा खोडके

## ◆क्लिनिकल रिसर्च असोसिएटच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आ.संजय खोडके यांच्या हस्ते उदघाटन

प्रतिनिधी ४ एप्रिल



**अमरावती:** किमान कौशल्य कौशल्य विकास कार्यक्रमा अंतर्गत रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे मोफत कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे औपचारिक उद्घाटन आ. संजय खोडके यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावतीच्या आ. सौ. सुलभाताई खोडके तसेच प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती च्या सहायक आयुक्त श्रीमती प्रांजली बारस्कर , कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे, रेडियंट सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. आनंद काकाणी, डॉ. पवन अग्रवाल, डॉ. माधुरी अग्रवाल, डॉ. सिकंदर अडवाणी, डॉ. सीमा अडवाणी, डॉ. अनुराधा काकाणी, प्रशासकीय अधिकारी सारंग लकडे, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

किमान कौशल्य विकास कार्यक्रमाचे उद्घाटक - आमदार संजय खोडके यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ठबदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात तांत्रिक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. ग्रामीण भागातील युवकांना अशा आधुनिक प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## आ. राणा यांची उद्योग प्रधान सचिव यांच्याशी चर्चा



प्रतिनिधी ४ एप्रिल

**अमरावती :** अमरावती येथे पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्क प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आ.रवी राणा व विधानसभा आश्वासन समितीच्या अध्यक्षांच्या उपस्थितीत या संबंधाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रधान सचिव (उद्योग) व व्यवस्थापकीय संचालक यांच्यासोबत प्रकल्पाच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा आ.रवी राणा यांनी बैठकीतून करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते, तसेच टेक्स्टाईल पार्कचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकल्पातील महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करताना सुमारे ?१७१ कोटी खर्चातून ७ किलोमीटर वीज वाहिनी टाकण्याचा प्रस्ताव बाबत अधिकाऱ्यानं कडून माहिती घेतली. तसेच, अंदाजे १०२५ एकर जमीन औद्योगिक वापरासाठी विकसित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे बैठकीत अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

याशिवाय ३० केव्ही जी एक्सप्रेस लाईन केबल टाकणे आणि फिशर हब परिसरात सब-सेंटर उभारणे यावरही अधीक्षक अभियंता वितरण देवाहाते यांनी सांगितले.

# काँग्रेसच्या 'संघटन सुर्जन' अभियानाला वेग; निष्ठावान कार्यकर्त्यांना मोठी संधी

प्रतिनिधी ४ एप्रिल




**अमरावती:** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या शिक्षकांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'संघटन सृजन ' अभियानांतर्गत संघटनात्मक जोडणीचे ७ वे चरण आता जिल्ह्यात सुरू करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार असून, जिल्ह्यातील विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

या अभियानांतर्गत काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना प्राधान्याने संधी देण्यात येणार आहे. तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये सक्रियपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मानही केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्या आणि संघटन मजबूत करण्यासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक आफताब अहमद व आमदार भाई जगताप यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, संघटनात्मक मजबुतीसाठी हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून, तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री सुनील देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार वीरेंद्र जगताप , माजी महापौर विलास इंगोले, बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेठ, महिला काँग्रेस अध्यक्ष जयश्री वानखेडे, हरिभाऊ मोहोड आदी उपस्थित होते.

# चक्रव्यूहात फसलेले बच्चू कडू बाहेर पडणार का?

## ◆ माजी मंत्री बच्चू कडूंवर गुन्हा दाखल होताच राजकीय वातावरण तापले

संदीप मानकर ४ एप्रिल



**अमरावती:** अचलपूरचे विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्या चुलत बंधू विरोधात अपघाताचा बनाव करून त्यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी माजी आमदार बच्चू कडू व इतर व्यक्तीविरुद्ध अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अंतर्गत येणाऱ्या चांदूरबाजार पोलिसांनी गुड फ्रायडेच्या दिवशी गुन्हा नोंदवला.या प्रकरणाची अधिकृत माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी अधिकृत पत्र परिषद घेऊन दिली.

यासंदर्भाची माहिती बाहेर व्हायरल होताच अमरावती जिल्ह्याचे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलनासाठी फेमस असलेले माजी मंत्री बच्चू कडू यामुळे चक्रव्यूत फसले आहेत.

मात्र राजकीय पैलवान असलेले बच्चू कडू चक्रव्यू भेदून बाहेर पडणार का? अशी चर्चा आता राजकीय गोटात रंगू लागली आहे.

माजी आमदार बच्चू कडू व इतर काही लोकांच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने बच्चू कडूंच्या अडचणीत आणखीन वाढ झाली आहे.

मात्र मै, झूकेंगा नही! झुकतील ते बच्चू कडू कसले? त्यांनीही थेट शासनाचे विरोधातच दंड थोपटून शुक्रवारीच गुन्हा दाखल झाल्यानंतर काही वेळातच एक व्हिडिओ व्हायरल करून आपला या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे सांगून टाकले.

हे सांगत असतानाच देव जर नाराज असेल (देवा भाऊ) तर काही होऊ शकते. त्यांचे शासन आहे. फॉरेन्सिक लॅब ही त्यांच्याच आहेत. आम्हाला फसवणे त्यांच्यासाठी चुटकी भरायचा विषय आहे. हे सुद्धा सांगून टाकले. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांवरही प्रहार केला. जिल्हा पोलीस अधीक्षक कसे भारी आहेत? हे सुद्धा ते सांगायला विसरले नाहीत. ते सकाळी सहा वाजता उठून फौज फाटा घेऊन चांदूरबाजार ला आले व त्यांनी गुन्हा दाखल केला.

जिल्ह्यात एवढ्या मोठ्या घटना होत असताना माजी आमदारांवर गुन्हा दाखल करून एसपींची तातडीने पत्र परिषद घेण्याची हे पहिलीच वेळ असल्याचेही त्यांनी सांगितले. एसपीही त्यांचेच आहेत. हे सांगायलाही बच्चू कडू विसरले नाही.

मात्र, त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतरही त्यांनी शासनाला दम भरला. आम्हाला अटक व्हायची असेल तर प्रभू रामचंद्राच्या मंदिरातून होऊ, आता मात्र माझा नियोजित दौरा पंधरा दिवसापूर्वीच ठरला आहे. त्या ठिकाणी जात आहे. त्यामुळे बच्चू कडू येथून पडाला असे कोणी म्हणू नये, हे सुद्धा त्यांनी व्हिडिओतून सांगून टाकले.

त्यामुळे बच्चू कडूंनी जरी आपली बाजू सेफ केली असली तरी पोलीस आपली कारवाई करतीलच! ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

**शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी म्हणून आंदोलन**

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी म्हणून माजी मंत्री बच्चू कडू यांनी काही महिन्यापूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज मोझरीत अन्न त्याग आंदोलन केले होते. त्यामुळे एकीकडे बच्चू कडू महायुतीतील भाजपावर प्रहार करतात तर दुसरी कडे महायुतीतील शिवसेना( शिंदे गटाला) जवळ ठेवतात. ही दुहेरी भूमिका त्यांच्या राजकारणाचा भाग असला तरी भाजपाला ही आता ही बाब जिव्हारी लागत आहे. त्यामुळे यानंतर बच्चू कडूंची खच्चीकरण कसे होईल? या संदर्भाची एकही संधी भाजप सोडणार नसल्याचे बच्चू कडू चक्रव्युत अडकल्यानंतर आता राजकीय गोटात याचीही खुलेआम चर्चा सुरू आहे.

**भावासाठी आमदारही मैदानात**

माजी आमदार बच्चू कडू यांना पराभूत करून अचलपूरचे विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांनी बच्चू कडूंचा अभेद किल्ला राखला.

तेव्हापासूनच माजी आमदार बच्चू कडू हे अस्वस्थ झाले असून त्यांनी आपल्या आंदोलनाची तीव्रता वाढवली आहे.

मात्र बच्चू कडूंनी थेट भावावरच वार केला असून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आमदार प्रवीण तायडे ही मैदानात उतरली असून या प्रकरणात तातडीने चौकशी होऊन कारवाई व्हावी. या संदर्भाची चर्चाही त्यांनी मिडियाशी केली आहे. त्यामुळे निवडणुकीपासून एकमेकांचे वैरी असलेले आजी -माजी आमदार यांच्या मधले संबंध आणखीन आणल्या गेले आहे.

**निवडणुका जिंकण्यासाठी बच्चू कडूंची लाचारी**

काल परवा जिल्हा बँकेच्या परिसरात बँकेतर्फे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात माजी आमदार बच्चू कडू व पालकमंत्री चंद्र शेखर बावनकुळे यांनी एकमेकांवर स्तुती सुमने उधळली. आपण सर्व शेतकऱ्यांसाठी एकच आहो. शासन आपल्या पाठीशी आहे. असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

मात्र बच्चू कडू यांच्या वर गुन्हा दाखल झाल्यानंतर यासंदर्भात पालकमंत्र्यांना पत्रकारांनी विचारले असता, माजी आमदार बच्चू कडू यांनी निवडणुका जिंकण्यासाठी अशाप्रकारे लाचारी पत्करली आहे. हा प्रकार खेद जनक आहे. अशाप्रकारे प्लॅन करून राजकारणासाठी कोणाच्याही जीवावर उठणे ठीक नाही. असेही पालकमंत्र्यांनी मीडियाशी संवाद साधताना सांगितल्यामुळे माजी आमदार बच्चू कडून बद्दल ते कडू बोल बोलले याची चर्चाही अमरावतीच्या राजकारणात अधिक होती. त्यामुळे या प्रकरणात राज्याचे महसूल मंत्री आता अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री आक्रमक झाले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि ४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## विविध पुरस्कार आता ऑनलाईन पध्दतीने स्विकारणार -कृषी मंत्री ना.भरणे



**वाशीम :** कृषी विभागामार्फत देण्यात येणा-या विविध पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्यास कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.१५ एप्रिल २०२६ करण्यात येत आहे .तरी इच्छुक शेतकऱ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

## एकच ध्यास, जिल्ह्याचा विकास - सागर कोकास ...

# जिल्ह्यासाठी ५ हजार कोटीचा द्यावा निधी !

### *श्रेयवादाचा व भ्रष्टाचाराचा थांबवा विधी * आम आदमी पार्टीचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता सागर कोकास यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**विदर्भातील विकासापासून दूर असलेल्या आणि देशात आकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी तातडीने पाच हजार कोटीच्या विकास आराखड्यास शासनाने मान्यता देण्याची मागणी आम आदमी पार्टीचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता तथा वाशीमचे भूमिपुत्र सागर कोकास यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांना एक एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.**

या निवेदनात सागर कोकास यांनी विदर्भातील वाशीम जिल्हा हा आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. वाशीम जिल्हा औद्योगिक, शैक्षणिक, कृषी व रोजगार या क्षेत्रात मागासलेला आहे.जिल्ह्याची भौगोलिक, कृषी आणि मानवी संसाधनाची क्षमता लक्षात घेतल्यास योग्य नियोजन व गुंतवणूक केल्यास वाशीम जिल्हा हा प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करु शकतो असा दावाही कोकास यांनी केला आहे.वाशीम जिल्हासाठी पाच हजार कोटी रूपयाचा तातडीने विकास आराखडा मंजूर करून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा त्यांच्या क्षमतेनुसार विकास करण्यात यावा.प्रामुख्याने कारंजा(लाड) शहर हे वाशीम जिल्ह्यातील दर्जेदार शिक्षणाची पंढरी आहे. शासनाने कारंजा शहराला ' एज्युकेशनल हब 'म्हणून विकसित करावे.त्या ठिकाणी अभियांत्रिकी, मेडीकल, पॉलीटेक्नीक, स्कील डेव्हलपमेंट सेंटर, डीजीटल लर्निंग कॅम्पस उभारण्यात यावे.यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण स्थानिक स्तरावर उपलब्ध होईल असेही या निवेदनात सागर कोकास यांनी स्पष्ट केले आहे.



रिसोड तालुक्याला कृषी हब म्हणून विकसित करावे. त्या ठिकाणी आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान, कोल्ड स्टोरेज, अन्नप्रक्रिया उद्योग,, कृषी संशोधन केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केंद्र-संस्था सुरू कराव्यात.तसेच कापूस आणि सोयाबीन व ईतर पिकांवर आधारीत सुरू करून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही कोकास यांनी या निवेदनात नमूद केले आहे. मंगरूळपिर येथे लघु व मध्यम व्यावसायिकांसाठी लघु व्यावसायिक केंद्र उभारून एमएसएमईचे विशेष प्रोत्साहन द्यावे.त्यामध्ये लघु उद्योग, व्यापार, मार्केट यार्ड, वेअरहाऊस आणि सेवा उद्योगांना चालना दिल्यास मंगरूळपिर तालुक्याची अर्थव्यवस्था मजबूत होईल असेही सागर कोकास यांनी या निवेदनात म्हटले आहे. वाशीम आणि मालेगाव येथे औद्योगिक विकास केंद्र विकसित करण्यासाठी दोन्ही ठिकाणी नवीन औद्योगिक प्रकल्प सुरू करावेत, एमआयडीसी क्षेत्राचा विस्तार करून येथे आयटी पार्क, अँग्रो इंडस्ट्रीज, मॅन्यूफॅक्चरींग युनिटस व लॉजीस्टिक हब विकसित करावे.यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल आणि जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल असा दावाही सागर कोकास यांनी या निवेदनात केला आहे. जिल्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी रोजगार व कौशल्य विकासासाठी कौशल्य विकास केंद्र, आयटीआय, सूरू करून युवकांना रोजगाराभिमूख प्रशिक्षण द्यावे.तसेच त्यांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.जिल्ह्यात सर्वत्र पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.यामध्ये रस्ते, पाणी, विज, सिंचन आणि डीजीटल कनेक्टीव्हीटीमध्ये करून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाला गती देण्याची मागणीही कोकास यांनी या निवेदनातून मुख्यमंत्री महोदयांना केली आहे. शासनाने पाच हजार कोटीचा निधी वाशीम जिल्ह्यासाठी तातडीने द्यावा, यामध्ये कारंजा लाड येथे एज्यूकेशनल हबसाठी एक हजार कोटी, रिसोड येथे कृषी हब साठी एक हजार कोटी, मंगरूळपिर येथे लघुउद्योग व व्यापार विकासाठी ७५० कोटी, वाशीम आणि मालेगाव च्या औद्योगिक प्रकल्पासाठी एक हजार ५०० कोटी, कौशल्य विकास व रोजगारासाठी ५०० कोटी आणि पायाभूत सुविधेसाठी २५० कोटी रूपयाच्या निधीचे नियोजन करून तातडीने आकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्याला विकसित करून सुजलाम-सुफलाम करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी पुढाकार घेण्याची विनंतीही आपचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता सागर कोकास यांनी केली आहे.

### सागर कोकास यांचा वाशीम जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार

वाशीम शहराचे भूमिपुत्र असलेले सागर कोकास यांनी वाशीम शहरासह जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेतला आहे.जनसामान्यांचे प्रश्न सोडवून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि देशभरात आकांक्षीत जिल्ह्याची नोंद असलेल्या वाशीम जिल्ह्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आपला सदैव पुढाकार राहणार असल्याचा दावा सागर कोकास यांनी केला आहे. सद्या वाशीम जिल्ह्यात सत्ताधारी पक्षाचे पाच आमदार असून एक आमदार विरोधी पक्षाचे आहेत .तसेच विद्यमान खासदारही विरोधी पक्षाचे आहेत. यामध्ये तिन आमदार विधान परिषद सदस्य असून तिघेही सत्ताधारी पक्षातील आहेत.तर विधानसभेमध्ये वाशीम व कारंजाचे आमदार सत्ताधारी पक्षाचे आणि रिसोडचे एकमेव आमदार हे विरोधी पक्षाचे नेतृत्व करतात. या सर्व लोकप्रतिनिधींनी सुद्धा जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याची जनतेत चर्चा आहे.




## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागांतर्गत पोस्टर प्रेझेंटेशन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागांतर्गत पोस्टर प्रेझेंटेशनचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.ए. भाग १, २ आणि ३ च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०३ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आले होते. अर्थशास्त्र विभागाअंतर्गत आयोजित पोस्टर प्रेझेंटेशनचे उद्‌घघाटन महाविद्यालयाचे कला आणि विज्ञान शाखाप्रमुख डॉ. शरद वाघोळे, संजीव इंगळे यांनी फीत कापून केले.

### पत्रकार धनंजय कपाले यांना मातृशोक शांताबाई कपाले यांचे निधन

**वाशीम:** आई म्हणजे मायेचा अखंड झरा, कुटुंबाचा आधारस्तंभ आणि संस्कारांची शिदोरी असते. अशाच मायेच्या सावलीचा आधार हरपल्याने पत्रकार धनंजय कपाले यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या मातोश्री गं.भा. शांताबाई रमाकांत कपाले (वय ८५ वर्ष) यांचे शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. शांताबाई कपाले या अत्यंत साध्या, प्रेमळ व जिव्हाळ्याच्या स्वभावाच्या होत्या. त्यांनी आयुष्यभर कुटुंबाला एकत्र ठेवत आपल्या मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवले. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाच्या मनात त्यांनी आपुलकीची वेगळी छाप निर्माण केली होती. त्यांच्या जाण्याने केवळ कपाले कुटुंबच नव्हे, तर ओळखीच्या सर्वच स्तरांतून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असून, त्यांनी दिलेले संस्कार आणि आठवणीच आता त्यांच्या कुटुंबासाठी अमूल्य ठेवा ठरणार आहेत. त्यांचा अंत्यविधी शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मतीर्थ मोक्षधाम, वाशिम येथे पार पडणार असून, अंतिम यात्रा ड्रीमलँड सिटी येथील राहत्या घरातून निघणार आहे.



## घरकुल योजनेत हेराफेरी...

# योजना गावाच्या दारी, अनुदान पुढाऱ्यांच्या घरी !






● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### भ्रष्टाचार रोखण्याचे जिल्हा प्रशासनापुढे आव्हान

घरकुल योजनेच्या भ्रष्टाचाराची सुई प्रामुख्याने सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ऑपरेटर पासून ते थेट गृहनिर्माण अभियंता व गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत झुकते. आता यात जिल्हा प्रशासनातील देखील आणखी कोणी आहे का हे पाहणे देखील खुप महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच या अनियमिततांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासनाने प्रशासकीय वचक निर्माण करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील बोगस लाभार्थ्यांची कसून तपासणी करून दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई होणे अपेक्षित आहे. शिवाय सामाजिक लेखापरीक्षण करून, तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करणे जेणेकरून तक्रारदारांच्या तक्रारींची तातडीने दखल घेतल्या जाईल. परिणामी दोषी आढळून आलेल्यांवर कठोर कारवाई होईल आणि खऱ्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळेल. मात्र याआधी झालेला व सद्यस्थितीत सुरू असलेला भ्रष्टाचार पाहता या घोटाळयाची पाळंमुळ खुप खोलवर रुजली असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या योजनेतील भ्रष्टाचार रोखणे हे जिल्हा प्रशासनापुढे एक आव्हान उभे राहील्याची चर्चा आहे.

जिल्ह्यात गाजत असलेल्या घरकुल योजनेतील घोटाळ्याच्या प्रकरणात आता धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. ' ज्याच्या हाती ससा, तोच पारधी ' या जुन्या काळातील म्हणीप्रमाणे गावागावातील पुढाऱ्यांनीच या योजनेचा लाभ स्वतःच्या पदरात पाडून घेण्यासाठी हेराफेरी केली असल्याचे बोलले जात आहे. पात्र लाभार्थ्यांना डावलून बोगस लाभार्थ्यांच्या नावाखाली स्थानिक लोकप्रतिनिधींनी मलिदा लाटला असल्याची माहिती उघड होत आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी झाली तर पुन्हा एक महाघोटाळा उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याची वरिष्ठांनी दखल घेणे खुप गरजेचे आहे.

भ्रष्टाचारात रिसोड आणि मालेगांव तालुका अव्वलस्थानी असल्याची माहिती हाती आली असून सिटीन्यूज सुपरफास्ट या गंभीर प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत आहे. मात्र झोपेचे सोंग घेतलेले सबंधित प्रशासन अद्यापही झोपेतच असल्याने सर्व सामान्य नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. सदर घरकुल योजनेचा पहिला हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होताच, काही गावात स्थानिक पातळीवरील सरपंच, सचिव आणि ज्यांना घरकुलाचा कोठा वाटून देण्यात आला असे उपसरपंच व काही सदस्य यांचे कमिशन पहिले वर्ग करून द्यावे लागत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. तसं पहिलं तर प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे गोरगरिबांचे घराचे स्वप्न पूर्ण करणारी केंद्र व राज्य सरकारची स्तुत्य योजना आहे. गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना स्वतःच्या हक्काची घरे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा गाभा आहे. या योजनेद्वारे शहरी आणि ग्रामीण भागातील बेघर कुटुंबे तसेच कच्चा व मोडकळीस आलेल्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना सुरक्षित आणि मूलभूत सुविधांनी युक्त घरे पुरवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. त्यासाठी शासन हजारो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत आहे. मात्र ग्राम पंचायतीच्या सरपंच, सचिवांपासून ते थेट गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत खाबुगिरी मोठ्या प्रमाणात फोफावल्यामुळे या योजनेच्या मुख्य उद्देशालाच ' खो ' दिला जात आहे. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लाभार्थ्यांना घरकुल अनुदान वितरीत करण्यात आले असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. यात रिसोड तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावात शेकडो बोगस लाभार्थ्यांना घरकुल योजनेच्या अनुदानाचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात कोणतेही बांधकाम न करता दुसऱ्यांचे बांधकाम दाखवून हप्ते उचलण्यात आली असून आजमितीस सुद्धा हा गोरख धंदा जोमात सुरू असून सबंधित अधिकाऱ्यांना दाम देऊन काम करून घेतले जात आहे. अशी माहिती पुराव्यानिशी सिटीन्यूज सुपरफास्टच्या हाती आली आहे. शिवाय ज्या लाभार्थ्यांनी संबंधित सरपंच, सचिव आणि त्यांच्या वरिष्ठांना लाच देण्यास नकार दिला अशा लाभार्थ्यांच्या अनुदान हप्त्याचा वाटप जाणीवपूर्वक अडकवून ठेवला जातो व जे लाभार्थी दलालांमार्फत पैसे देतात त्यांचे अनुदानाचे हप्ते वेळेवर दिले जातात अशी खळबळजनक माहिती सूत्रांनी दिली आहे.







# जिल्ह्यातील अनेक गावे पाणी टंचाईच्या उंबरठ्यावर



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

एप्रिल महिन्याच्या सुरूवातीलाच जिल्हयातील बहुतांश गावात पाणी टंचाईची समस्या उदभवत आहे गावातील हातपंप, विहरीची पाणी पातळी चांगलीच खालावत असल्यामुळे महिलांना भर उन्हात पाण्यासाठी पायपीट करावी करावी लागत आहे.

गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी जिल्हयात पावसाचे प्रमाण चांगले आहे. त्यातच रब्बीचे पिक अनेक शंतकऱ्यानी घेतल्यामुळे पिके भिजविण्यासाठी मोठया प्रमाणावर विद्युत पंप चालविण्यात येत असल्यामुळे विहरी, हातपप, धरणातील पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. त्यामुळे अनेक गावतील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. वाशिम जिल्हयातील तामसी, मालेगांव तालुक्रूातील पांगरी नवघरे, खडकी, यासह इतरही गावात पाणी टंचाईची समस्या उदभवत आहे. जुन जुलै महिन्यात जिल्हयात वार्षीक सरासरी पावसाच्या तुलनेत प्रत्यक्ष पाउस चांगला पडला.जिल्हयातील काही गावात दरवर्षीच हिवाळत्त संपला की , पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. यासाठी दरवर्षीच लाखो रूपये खर्च केले जातात. परंतु पाणी



टंचाईची समस्या दरवर्षीच वाटयाला येत असल्यामुळे नाकरीकांत नारीचा सुर उमटत असुन कायमची पाणीटंचाई संपवावी अशी मागणी नागरीकांमधुन होत आहे.

वाशिम जिल्हयात दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लाखो रूपये खर्च करण्यात येतात तरीही जिल्हयात पाणी टंचाईची समस्या कायमच आहे. उन्हाळा सुरू होण्याआधीच जिल्हयातील बहुतांश गावात पाणी टंचाईची समस्या उदभवत आहे. तरी याबात प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरीकांमधून होत आहे.

### हातपंप बंद असल्यामुळे पाण्यासाठी पायपीट

मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे येथुन जवळच असलेल्या उमरदरी गावातील हातपंप बंद असल्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. मात्र, याबाबत ग्रामपंचायत उदासिन असल्यामुळे नागरीकात रोष व्यक्त होत आहे. तरी याकडे तातडीने लक्ष द्यावे. अन्यथा याविराधोत तीव्र आंदोलन करू. असा इशारा गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. उमरदरी येथे पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या आहे. त्यामुळे गावातील बंद पडलेले हातपंप तातडीने सुरू करावे. यासाठी सरपंच, सचिव यांना वारंवार विनंती करूनही समस्या कायम आहे. गावातील नागरीकांची मदार बंद पडलेल्या हातपंपावरच आहे. परंतु सदर हातपंप बंद अवस्थेत असल्यामुळे महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. तरी याबाबत तातडीने लक्ष द्यावे व गावातील बंद पडलेला हातपंप सुरू करावा अशी मागणी होत आहे.



### ...तरीही पाणीटंचाई धरण उषाला, कोरड घशाला

जिल्हयातील काही गावच्या जवळच धरणे बांधण्यात आली आहेत. तरीही अशा गावात प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे नागरीकांना दरवर्षीच पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशा गावासाठी प्रशासनाने पावले उचलुन पाईपलाईनची व्यवस्था करावी अशी मागणी होत आहे. परंतु याबाबत शासनाच्या उदासिन धोरणामुळे नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

### जिल्हा परिषद शाळेत साहित्य वाटप

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

रिसोड तालुक्यातील एकलासपूर या गावातील कु. अश्विनी मीरा भागवत देवकर ही सध्या स्थिती अकोला जिल्हा ग्रामीण रुग्णालयात अधिकारी म्हणून कार्यरत आहे जिल्हास्तरी रुग्णालयात आपली सेवा देत असून तिचा वाढदिवस आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये साजरा केला तिचे शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये वर्ग पहिली ते चौथीपर्यंत झालं आहे. त्यामुळे ज्या शाळेने आपल्याला ज्ञानार्जन करण्याची संधी दिली. व त्यामुळे आज आपल्या परिवारासाठी पैसे कमवण्याची संधी सुद्धा प्राप्त झाली त्याचेच काही देणे लागते त्याप्रमाणे आयुष्यातील आलेला जन्मदिवस आपल्या मित्रासोबत किंवा इतर सहकार्यासोबत साजरा न करता आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यासोबत साजरा केला. व शाळेलाही आपल्या वाढदिवसानिमित्त स्पीकर व प्रत्येक मुलाला लेटर पॅड



कंपास व चॉकलेट भेट दिली. त्यामुळे सर्व मुलांचा आनंद द्विगुणित झाला. व सर्वांनी वाढदिवसानिमित्त कु.अश्विनी देवकर हिला मनापासून शुभेच्छा दिल्या व आपल्या शाळेविषयी असलेली आस्था कायम ठेवली. व विद्यार्थ्याप्रती असलेले प्रेम हे सुद्धा असेच कायम असू द्यावे अशी आशा जिल्हा परिषद शाळेच्या वतीने करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक व सहाय्यक शिक्षक, कु. अश्विनीची आई व गावकरी मंडळी, व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोपाल संजय सोनुने हे उपस्थित होते. कुमारी अश्विनीचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कुमारी अश्विनी हिने या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कोणतीही भविष्यात मदत लागल्यास मी निःसंकोचपणे मदत करेल असेही सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# वीज पुरवठ्याच्या समस्येमुळे घिर्णी व बेलाड ग्रामस्थांचे साखळी उपोषण

प्रतिनिधी ४ एप्रिल

*__खामगाव :__ मलकापूर विभागातील घिर्णी व बेलाड गावांमध्ये गेल्या काही गंभीर व दिवसांपासून सुरू असलेल्या वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या वतीने वसंता बाबुराव चित्रंग ग्रामस्थांनी बेमुदत साखळी आमरण उपोषण सुरू केले असून, वीजपुरवठा सुरळीत करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे.*



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या महिनाभरापासून सिंगल फेज लाईन १४-१४तास बंद राहत आहे, तर थ्री फेज लाईन देखील नियमितपणे सुरू होत नसल्याने मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः शेतीसाठी आवश्यक असलेला पाण्याचा पुरवठा खंडित होत असल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे.

याशिवाय, थ्री फेज लाईनवरील तारा जास्त भारामुळे वारंवार ट्रिप होत असल्याची समस्या देखील ग्रामस्थांनी मांडली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असून लाईट नसल्यामुळे अभ्यासात अडचण निर्माण झाली आहे. महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी केल्यानंतर २९ मार्च सोमवार पासून नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यात आला परंतु कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.या सर्व समस्यांच्या निषेधार्थ वसंता बाबुराव चित्रंग व घिर्णी बेलाड ग्रामवासी यांनी बेलाड सब स्टेशन समोर बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या या आंदोलनाला घिर्णी व बेलाड गावातील ग्रामस्थांचा पाठिंबा मिळत असून, लवकरात लवकर वीजपुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे, उपाध्यक्ष बाळूभाऊ ठाकरे, तालुकाध्यक्ष गोपाल सातव, वसंता चित्रंग अमोल चोपडे, धनराज ढोन, राजू भोपळे, गजानन चोपडे अनंता तांगडे, प्रशांत संबारे तुळशीराम चोपडे व इतर गावकरी उपस्थित होते.

### विजेच्या लपंडावाला नागरिक त्रासले

विजेच्या लपंडावाला या भागातील नागरिक त्रासले आहेत. महावितरण यंत्रणा लक्ष देत नाही. त्यामुळे समस्या कायम आहेत. विविध प्रश्नांचे निराकरण व्हावे यासाठी नागरिक सतत पाठपुरावा करतात. परंतु काही मार्ग निघत नाही म्हणून उपोषण सुरू केले. आता तरी वरिष्ठांनी लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

# वीज पडून बैल ठार ; तर दुसरा जखमी

प्रतिनिधी ४ एप्रिल

**दे. राजा :** तालुक्यातील निमखेड परिसरात अवकाळी पावसासह कोसळलेल्या विजेने मोठा अनर्थ घडला असून, शेतात काम सुरू असताना एका शेतकऱ्याचा बैल जागीच ठार झाला तर दुसरा बैल गंभीर जखमी झाल्याची घटना १ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत प्राप्त माहितीनुसार, शेतकरी लक्ष्मण रामभाऊ कडुळे हे आपल्या शेतात बैलांच्या सहाय्याने काम करत असताना अचानक वाऱ्यासह पावसाची सुरुवात झाली. याचदरम्यान आकाशात वातावरणात बदल होऊन वादळी कडकडाट होत असताना अचानक वीज कोसळली आणि या दुर्घटनेत एक बैल जागीच मृत्यूमुखी पडला, तर दुसरा बैल गंभीर जखमी झाला.या घटनेमुळे शेतकऱ्याचे अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच परिसरात झालेल्या अवकाळी पिकांचेही मोठ्या प्रमाणावर



नुकसान झाल्याचे चित्र आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.दरम्यान, अचानक ओढवलेल्या या संकटामुळे शेतकरी कडुळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे

# अज्ञात इसमाची रेल्वेसमोर उडी घेवून आत्महत्या

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव:** बिस्वाब्रिज ते मलकापूर स्टेशन दरम्यान अप लाईनवर रेल्वे गाडीसमोर उडी घेत आत्महत्या केली असल्याचा मेमो मलकापूर ग्रामीण पो. स्टे. ला दिल्यावरून मर्ग दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ट्रॅकमॅन निलेश राजाराम ढोले युनिट नंबर १ वडोदा स्टेशन यांनी मेमो आणुन सादर केला की, अप लाइनच्या मध्ये बिस्वा ब्रिज ते मलकापूर स्टेशन दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने २ एप्रिल रोजी १.५० वा. पुर्वी गाडी क्र. श्इएउ चे समोर आत्महत्या केली. असा मेमो उप स्टेशन प्रबंधक कार्यालय, मलकापूर यांचेकडुन प्राप्त झाल्यावरून मलकापूर शहर पो. स्टे. ला मर्ग क्र. १३/२०२६ कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्ष संहिता २०२३ दाखल करण्यात आला आहे.मृतक अनोळखी पुरुष अंदाजे ६५-७० वर्षाचा असून या घटनेचा अधिक तपास बिट सपोउपनि उल्हास मुके करीत आहेत.

## डिपीवरील तार चोरी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव:** माकनेर शेत शिवारातील डिपीवरील अंदाजे ४५ हजार रूपये किंमतीची ॲल्युमिनीयम तार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार मलकापूर ग्रामीण पो. स्टे. ला दिल्यावरून अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.संदीप मधुकर श्रीधनकर (वय ३७ वर्ष) सहायक अभियंता प्रभार दाताळा महावितरण केद्र रा. मलकापूर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, २६ फेब्रुवारीचे रात्री अज्ञात आरोपीने माकनेर शेत शिवारातील काटी रस्ता डीपी वरील १५ गाळे व उमाळी शिवारात चोरी केली होती.

## रेतीची चोरुन वाहतूक; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव :** ग्राम अधिकारी यांच्या तक्रारीवरून टिप्परद्वारे चालकाविरूध्द शेगाव ग्रामीण पो.स्टे.ला टिप्पर चालकाविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेसंदर्भातील हकीकत अशी की, ग्राम तिव्हाणबु. तिव्हाण खु., टाकळी धारव, सांगवा, एकफळ साजा मध्ये कार्यरत ग्राम महसुल अधिकारी तथा फिर्यादी कु. वैष्णवी नारायण भेले (२९) यांनी शेगाव ग्रामीण पोलीसांत दिलेल्या तक्रारीनुसार ३० मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता सुमारास फिर्यादी ह्या कर्तव्यावर असताना टिप्पर वाहन क्रमांक एमएच २८ बीबी ६८२० क्रमांकाच्या टिप्परमधून दोन ब्रास रेती चोरून वाहतूक होत असल्याचे त्यांना दिसून आले. त्यांनी उपरोक्त टिप्परच्या चालकास थांबवले असता तो थांबला. परंतु फिर्यादी ह्या लोकांचे सोबत बोलण्यात व्यस्त असल्याचे पाहुन रेतीसह टिप्पर घेऊन पळून गेला. फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरून टिप्पर चालकाच्या विरूध्द शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता-२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा तपास बीट अंमलदार पोहेकॉ अनिल बरींगे हे करित आहेत

# जवळा बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णसेवा विस्कळीत

### परिसरातील नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव :** शेगाव तालुक्यातील जवळा बु, येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सध्या 'रामभरोसे' सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असतानाही डॉक्टर नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, नियुक्त वैद्यकीय अधिकारी केंद्रात नियमित हजर राहत नाहीत. अनेकदा फोन करूनही प्रतिसाद मिळत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. परिणामी, उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते किंवा शेगाव, खामगाव, अकोला येथील रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागत आहे. जवळा व परिसरातील चिंचोली, नागझरी, तरोडा, कसबा गव्हाण, वरुड आदी गावांतील नागरिक या केंद्रावर अवलंबून आहेत. डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे मात्र ग्रामीण भागातील रुग्णसेवा विस्कळीत झाली आहे. विशेषतः वृद्ध, महिला व बालकांना याचा मोठा फटका बसत आहे. डॉक्टरांची बाजू जाणून घेण्यासाठी त्यांच्यासोबत संपर्क केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. डॉक्टर असूनही ते नियमित हजर राहत नाहीत. त्यामुळे रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देऊन डॉक्टरांची उपस्थिती सुनिश्चित करावी, अशी मागणी गोटीराम सावदेकर व धनंजय दांडगे यांनी केली.

### आपत्कालीन सुविधांचाही जाणवतोय मोठा अभाव

दिलावर कुरेशी यांनी सांगितले की, केंद्रात कोणतीही आपत्कालीन सुविधा उपलब्ध नाही. दुपारनंतर कर्मचारी निघून जातात, तर डॉक्टर आठवड्यातून एक-दोन वेळाच येतात. त्यामुळे अचानक आजार किंवा अपघात झाल्यास रुग्णांना तत्काळ उपचार मिळत नाहीत. उपकेंद्रांअंतर्गत गावांमध्ये आरोग्य सेवक व लसीकरण सेवा वेळेवर होत नसल्याच्या तक्रारीही आहेत. सध्या वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात, ताप, उलट्या-जुलाब, अशा आजारांचे प्रमाण वाढले आहे. अशा स्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे.

# श्री रेणुकामातेच्या यात्रा महोत्सवानिमित्त महाप्रसाद



प्रतिनिधी ४ एप्रिल

**चिखली :** श्री रेणुकामातेचा यात्रा महोत्सव व हनुमान जयंतीच्या पावन पर्वावर चिखली येथे प्राचार्य डॉ. निलेश गावंडे मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसाद वितरण व आकर्षक आतिषबाजीचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

गुरुवार, २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता प्राचार्य डॉ. निलेश गावंडे यांच्या निवासस्थानासमोर प्राचार्य डॉ. निलेश गावंडे व प्रा. डॉ. सौ मीनलताई निलेश गावंडे यांनी मिरवणूकीचे जल्लोषात स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात व भक्तिमय वातावरणात झालेल्या या स्वागत सोहळ्याने परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी वगदी सेवाधारी व भाविकांसाठी महाप्रसाद वितरणाचे आयोजन प्राचार्य डॉ. निलेश गावंडे व प्रा. डॉ. सौ मीनलताई निलेश गावंडे यांच्या वतीने करण्यात आले होते.

मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभघेतला. या उपक्रमामुळे सामाजिक एकोपा दृढ होण्यास तसेच धार्मिक भावना अधिक बळकट होण्यास मदत झाली. याचबरोबर, श्री रेणुकादेवी यात्रा महोत्सवानिमित्त वहन मिरवणुकीचे स्वागत अधिक आकर्षक व संस्मरणीय करण्यासाठी राऊतवाडी स्टॉप येथे भव्य बारूदखान्याचे (आतिषबाजी) आयोजन करण्यात आले होते. रंगीबेरंगी फटाक्यांनी आकाश उजळून निघाले आणि उपस्थित नागरिकांनी या नेत्रदीपक दृश्याचा मनमुराद आनंद लुटला. नयनरम्य आतिषबाजीमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी राऊतवाडी स्टॉप मित्र मंडळाचे सहकार्य लाभले.

# शेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था दयनीय !

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव :** शेगाव तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली असता ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. कागदोपत्री सक्षम भासणारी आरोग्य व्यवस्था प्रत्यक्षात मात्र अपुरी ठरत असून, रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर, नर्स व इतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर कमतरता असल्याचे स्पष्ट झाले आहे. नर्सिंग स्टाफ अपुरा असल्याने सेवांची गुणवत्ता देखील घसरत आहे.

औषधांच्या तुटवड्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. अनेक केंद्रांमध्ये आवश्यक औषधे उपलब्ध



नसल्याने रुग्णांना खासगी दुकानांतून औषधे खरेदी करावी लागत आहेत. असून, काही केंद्रांमध्ये आवश्यक उपकरणांचाच अभाव असल्याचे आढळले. याशिवाय, दीर्घ प्रतीक्षा वेळ, स्वच्छतेचा अभाव, पिण्याच्या पाण्याची अपुरी सुविधा, तसेच वीजपुरवठ्यातील अडचणी यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

# सातपुडा पर्वतरांगांमध्ये सालयच्या डिंकाची तस्करी

प्रतिनिधी ४ एप्रिल

### वन विभागाचे दुर्लक्ष; नागरिकांचा आरोप

**खामगाव :** जामोद सातपुडा पर्वत परिसरातील जंगलामध्ये सालय(सलई)च्या डिंकाची मोठ्या प्रमाणावर तस्करी सुरु असल्याचा प्रकार समोर आला आहे. डिंकाला बाजारात चांगला भाव मिळत असल्याने काही व्यापारी आणि तस्कर आदिवासींकडून डिंक गोळा करून अवैध मार्गाने विक्री करत असल्याचे चित्र आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डिंकाचे उत्पादन वाढविण्यासाठी काही ठिकाणी सालयच्या झाडांना जाणीवपूर्वक आग लावली जात आहे. उष्णतेमुळे झाडांमधून अधिक प्रमाणात डिंक बाहेर पडतो, याचा फायदा घेत तस्करांकडून वनक्षेत्रात वारंवार आगी लावल्या जात असल्याचे सांगितले जाते.

या आगीमुळे वन्यजीवही परिसर सोडून जात असल्याने पर्यावरणीय समतोल धोक्यात येत आहे. जामोद रेंज मधील ईसाई, कुवरदेव, गोमाल, चाळीस टापरी आदी सातपुडा परिसरातील जंगलामध्ये हा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे; मात्र या गंभीर प्रकरणाकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिकांच्या मते, वनकर्मचारी जंगलात गस्त घालताना क्वचितच दिसून येतात.

**वन विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित वनक्षेत्रात नियमित गस्त नसल्याने तस्करीला आळा बसत नाही. वनकर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे तस्करांचे मनोबल वाढले असून, या प्रकाराकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी जोर धरत आहे.

## मातंग समाजबांधवांनी सचिन साठे यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले

प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव :** शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या प्रकरणावर लवकरच तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याची माहिती अण्णा भाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांनी दिली. खामगाव येथे मातंग समाजाच्या . उपोषणाला भेट देताना त्यांनी हे आश्वासन दिले.

खामगाव येथे १७ मार्च रोजी खामगाव रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ अज्ञात व्यक्तींनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा उभारला होता. हा पुतळा त्याच ठिकाणी कायम ठेवून परिसराचे सौंदर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी अण्णा भाऊ साठे स्मारक समिती व मातंग समाज बांधवांचे २५ मार्चपासून नगरपरिषदेसमोर साखळी उपोषण सरू आहे. या आंदोलनस्थळीभेट देऊन सचिन साठे म्हणाले की, समाजाच्या भावना लक्षात घेऊन पुतळा ज्या ठिकाणी आहे, तेथेच कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहोत. आमदार अमित गोरखे यांच्यासह मुख्यमंत्री यांची भेट घेऊन हे प्रकरण मार्गी लावले जाईल. यावेळी राष्ट्रीय मातंग स्वाभिमानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू मानकर यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. त्यांनी पुढील पाच दिवसांत निर्णय न मुंबईतील झाल्यास आझाद मैदान येथे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला. यावेळी संताराम तायडे, सचिन साठे, राजुभाऊ मानकर (मुंबई), गजानन वानखडे, हरी दांडगे, रमेश दोडके, सनी नेटके, भारत बिराडे, अनिल सुरळकर, गणेश तांबे, विलास मानवतकर, गजानन पवार, संजय बोदडे, महादेव अडायके, अशोक तायडे, लखन सोनोने, कृष्णा नाटेकर आदी समाज बांधवत उपस्थित होते.

# 18 गडक-यांनी बैलगाड्या ओढून फेडला नवस



प्रतिनिधी ४ एप्रिल

**खामगाव :** येथील महात्मा बसेश्वर चौकातील पुरातन खंडोबामंदिरा तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही २ एप्रिल २६ रोजी श्री हनुमान जन्मोत्सवा निमित्त सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास येळकोट येळकोट जय मल्हार चा जयघोष करीत १८ गडकऱ्यानी १२ बैलगाड्या ओढण्यास सुरुवात केली. या बैलगाड्या दोरानी एका मागून एक याप्रमाणे बांधण्यात आल्या होत्या. या मंदिरा तर्फे बैलगाड्या ओढण्याची दीड शतकापासूनची परंपरा आजही कायम आहे.

विकास भोसले, सागर भोसले, दीपक भोसले, विशाल जोगदंड, नितीन जाधव, उमेश जाधव, सचिन शिंदे, संभाजी तासतोडे, सोहम माटकर, रामा उन्हाळे, शंकर गुजरीवार, सोनू बावस्कर, शिवशंकर मच्छिंद्र, अक्षय सातपुते, श्याम पवार, ओम फरांडे, लकी बहिरे, माऊली रेडे या गडकऱ्याचे पूजन करून त्यांना भंडारा (हळद) लावण्यात आला. खंडोबा मंदिरात गडकऱ्यांना भंडारा लावण्यात आला

### बैलगाड्या ओढण्याची दीड शतकाची परंपरा

होता. भक्ती भावाने साजरा करण्यात येणारा १२ गाड्या ओढण्याचा कार्यक्रमात खामगाव शहरासह जिल्हाभरातील हजारो खंडोबा भक्त सहभागी झाले होते. बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम पाहण्यासाठी मार्गातील रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी केली होती . शहरातच हा उत्सव पार पडत असल्याने या उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.येथील बसेश्वर चौक, आठवडी बाजार, भुसावळ चौक व कमलसिंह गौतम चौक येथून परत गडकऱ्यानी १२ गाड्या ओळीत ते खंडोबा मंदिरात आले तेथे त्याचा समारोप पार पडला. पुरातन काळापासून चालत आलेली ही प्रथा यापुढेही कायम ठेवण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे खंडोबा मंदिराचे सर्वेसर्वा रवी भोसले यांनी सांगितले.

खंडोबा मंदिरात ३ एप्रिल २६ रोजी सकाळी ६ वाजता हजारो भक्तांच्या उपस्थितीत खंडोबा व माता बाणाई यांचा



लग्न सोहळा पार पडला. खंडोबाराचे मंदीर २ व ३ एप्रिल २६ रोजी २४ तास उघडे ठेवण्यात आले होते. या ठिकाणी शहरासह जिल्हाभरातील खंडोबाभक्त दर्शनासाठी आले होते. हनुमान जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाची सांगता ३ एप्रिल रोजी जागरण गोंधळ व साखळदंड तोडून करण्यात आली. हनुमान जयंतीच्या दिवशी २ एप्रिल रोजी खंडोबा मंदिरा तर्फे यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी प्रसाद, हार, फुले, नारळ, लहान मुलांची खेळणी आदींची दुकाने थाटण्यात आली होती. या उत्सवा दरम्यान खामगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि.४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# यंदा अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनो, आवश्यक कागदपत्रे केली का तयार !

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** राज्यात अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने पालक आणि विद्यार्थ्यांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणताही विलंब किंवा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे वेळेपूर्वीच तयार ठेवावीत, असे स्पष्ट केले आहे.

मागील वर्षापासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबवली जात असल्यामुळे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना विविध माहिती अचूकपणे नोंदवावी लागत आहे. यासोबतच प्रवेश निश्चित करताना संबंधित

## नाहीतर वेळेवर होईल धावपळ




कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर करणे बंधनकारक असते. त्यामुळे कागदपत्रे अपूर्ण किंवा चुकीची असल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

गेल्या वर्षी अनेक विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध नसल्यामुळे प्रवेश प्रक्रियेत विलंब झाला होता. काही प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना पुढील फेऱ्यांची प्रतीक्षा करावी लागली होती. ही परिस्थिती टाळण्यासाठी यंदा शिक्षण विभागाने आधीच सज्ज राहण्याचा सल्ला दिला आहे. विशेषतः आरक्षणाच्या विविध प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित प्रमाणपत्रांची पूर्तता वेळेत करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्जाच्या पहिल्या टप्प्यातच या कागदपत्रांची पडताळणी केली जाते. त्यामुळे कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी पालकांनीही जागरूक राहणे आवश्यक आहे. शाळांनी विद्यार्थ्यांना कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करून आवश्यक ते सहकार्य करावे, तसेच पालकांनी आपल्या पाल्याची सर्व कागदपत्रे तपासून पूर्ण ठेवावी, असे आवाहन केले आहे.

### आवश्यक कागदपत्रे

◆दहावीचे गुणपत्रक
शाळा सोडल्याचा दाखला (लिव्हिंग सर्टिफिकेट)
महाराष्ट्राचा अधिवास दाखला
जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)
नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र
आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र
दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र

अकरावी प्रवेश प्रक्रियेत यशस्वी होण्यासाठी केवळ गुण नव्हे, तर कागदपत्रांची वेळेत पूर्तता ही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे.

# बाजारात स्टोव्ह गायब, रॉकेल काय प्यायचे का साहेब ?

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** आखाती युद्धामुळे देशातील इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे त्यामुळे गॅस सिलेंडर कंपन्यांनी बुकिंग कालावधी वाढवला सिलेंडर बुक केल्यानंतरही दहा ते बारा दिवसानंतर डिलिव्हर होत आहे त्यामुळे एकच सिलेंडर असणाऱ्यांचे हाल होत आहेत या पार्श्वभूमीवर सरकारने आता पेट्रोल पंपांवर रॉकेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. तर दुसरीकडे बाजारपेठेत स्टोव्हच उपलब्ध नाही त्यामुळे मिळणारे रॉकेल कसे उपयोगात आणायचे असा प्रश्न गृहिणी समोर पडला आहे. शहरातील हॉटेल व्यवसायिकांना सुद्धा कमर्शियल



सिलेंडर मिळणे बंद झाले आहे त्यामुळे हॉटेल व्यवसायिकांना चूल किंवा ई शेगडीचा आधार घ्यावा लागत आहे. गॅस सिलेंडर साठी तासनतास गॅस एजन्सी बाहेर रांगा लागत आहेत अनेकांना गॅस बुकिंग करण्यात अडचणी येत आहेत त्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पेट्रोल पंपांवर रॉकेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला मात्र रॉकेल मिळाले तरी ते वापरण्यासाठी आवश्यक असलेले स्टोव्ह बाजारात उपलब्ध नाहीत. सिटी न्यूज सुपरफास्ट मे शहरातील भांड्यांच्या दुकानावर पाहणी केली असता रॉकेलवर चालणारे विक्रीसाठी दिसून आले नाहीत.

### जुने स्टोव्ह आहेत पण....

◆अनेक कुटुंबांकडे जुने स्टोव्ह आहेत जे अडगळीत पडले आहेत त्यांना गंज लागला आहे आता ते उपयोगात आणायचे म्हटले तर त्यांना बर्नर, वाती, वायसर, पिन, लागणार आहेत परंतु स्टोव्ह चा वापर कमी झाल्याने हे पार्टही आता बाजारात उपलब्ध नसल्याचे दिसून आले सध्या बाजारात ती शेगडी आणि कोळशावर चालणाऱ्या शेगड्या उपलब्ध आहेत. गॅस चा वापर वाढल्याने स्टोव्ह चे उत्पादन कंपन्यांनी जवळपास बंद केले आहेत त्यामुळे अनेक दुकानात स्टोव्ह उपलब्ध नसल्याचे दिसून आले

◆रॉकेल येईल हे मी ऐकून आहे त्यामुळे शहरातील अनेक दुकानांमध्ये स्टोव्ह बाबत विचारणा केली मात्र कुठेही रॉकेल वर चालणारा स्टोव्ह मिळाला नाही रॉकेल आल्यानंतर मोठी गर्दी होईल त्यामुळे आधीच शोध घेतला परंतु तो निष्फळ ठरला
**भाग्यश्री सवाईबहादूर**

◆रॉकेट येईल पण ते वापरायचे कशात हाच मोठा प्रश्न आहे बाजारात स्टोव्हच उपलब्ध नाहीत दुकानदारांकडे विचारले असता आधी रॉकेल येऊ द्या मग पाहू असे उत्तर मिळते
**सौ गायत्री खड्सने**

# अवकाळी पावसामुळे कलिंगडाचे नुकसान

## ♦ बाजारपेठेत कलिंगडाचे भाव कोसळले

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** उन्हाळ्यात मोठी मागणी असलेल्या कलिंगडाच्या दरात अकोला जिल्ह्यात यंदा मोठी घसरण झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीला मिळालेला चांगला दर आता घसरून उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले असून, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. जिल्ह्यात सध्या कलिंगडाचा हंगाम सुरू असताना बाजारात दर मात्र घसरलेले आहेत. हंगामाच्या सुरुवातीला प्रतिक्विंटल दोन हजार रुपयांपर्यंत दर मिळालेल्या कलिंगडाला सध्या केवळ ५०० ते ६०० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च भागवणे ही कठीण झाल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. इतर भागांतही अशीच



परिस्थिती असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या दीड महिन्या पासून कलिंगडाच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. व्यापारी विविध कारणे देत कमी दरात माल घेण्याचा प्रयत्न करत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान वाढत आहे. सध्या दर्जेदार कलिंगडाला ही अपेक्षित मागणी मिळत नसून, दुय्यम प्रतीच्या मालाला तर बाजारात फारसा प्रतिसाद मिळत नाही. अशा मालाचे सौदे ३०० ते ४०० रुपये प्रतिक्विंटल दराने होत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे.


# एमआयडीसी परिसरात भीषण अपघात

## ♦ दुचाकी चालक गंभीर जखमी

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत बीके चौक ते येवता रोडवरील सकाळ प्रेसजवळ शनिवारी सकाळी भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात दुचाकी चालक विपुल चक्रनारायण हे गंभीर जखमी झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, सकाळच्या सुमारास घडलेल्या या अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेतली. जखमी अवस्थेत असलेल्या विपुल यांना तातडीने मदत करत नागरिकांनी १०८ रुग्णवाहिका सेवेला संपर्क साधला. काही वेळातच रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली आणि जखमींना



अकोला येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दुचाकी चालकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, याचा तपास एमआयडीसी पोलीस स्टेशनकडून सुरू असून, पुढील चौकशी केली जात आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अकोल्यात मध्यरात्री अपघात, थार गाडीची सिग्नल खांबाला धडक

प्रतिनिधी ४ एप्रिल

## ♦ सिटी कोतवाली परिसरातील घटना

**अकोला :** शहरातील सिटी कोतवाली पोलिस स्टेशन जवळ मध्यरात्री अपघात झाला. एमएच ३० बीडब्ल्यू १२१३ क्रमांकाच्या थार गाडीच्या चालकाने सिग्नलच्या खांबाला जोरदार धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री अंदाजे १ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. सिटी कोतवाली पोलीस स्टेशन जवळून जात असताना भरधाव वेगात असलेल्या थार गाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटले. आणि गाडी थेट सिग्नलच्या खांबावर आदळली. या धडकेत सिग्नलचा खांब नुकसानग्रस्त झाला असून गाडीचे देखील मोठे नुकसान झाले आहे.अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. प्राथमिक



तपासात वेग आणि निष्काळजीपणा हे अपघाताचे कारण असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित चालकाविरोधात कारवाई सुरू आहे.

# विदेशी महिलेसह देहविक्री रॅकेटचा भंडाफोड

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** खदान पोलिस स्टेशनच्या हद्दीत कारवाई करुन एका विदेशी महिलेसह तिघांना देहविक्रीच्या आरोपावरून ताब्यात घेतले. गोरक्षण मार्गालगत उच्चभ्रू वस्तीत टांझानिया देशातील एका परदेशी महिलेला आणून देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती खदान पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन महिलांसह एका पुरुष आरोपीला अटक केली.

शहरातील गोरक्षण मार्गालगतच्या एका अपार्टमेंटच्या तळमजल्यावरील सदनिकेत हा अनैतिक व्यवसाय सुरू होता. या ठिकाणी उच्चभ्रू ग्राहकांना लक्ष्य करून देहविक्रीचे जाळे चालवले जात असल्याचे उघड झाले आहे.

पोलिसांनी अनैतिक मानवी वाहतूक

## ♦ पोलिसांनी तिघांना केली अटक



प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून, अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून अधिक माहिती घेण्याचे काम सुरू आहे. या रॅकेटमधून आणखी कोणकोण सहभागी आहेत, तसेच परदेशी महिलेला भारतात कसे आणले जात होते, याचा तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून यामागे मोठे जाळे कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या रॅकेटमध्ये विदेशी एका महिलेचा समावेश असल्यामुळे हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, उच्चभ्रू वस्त्यांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांवर पोलिसांनी कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

टांझानिया येथील महिला अकोल्यातील एका महिला आरोपीच्या संपर्कात मुंबईत आली. त्यानंतर तिला वेश्या व्यवसायासाठी अकोला शहरात आणल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलिस निरीक्षक मनोज केदारे व अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने केली.

# शेतकऱ्यांचे दिवाळे निघाल्यानंतर कापसाला सोन्याची झळाळी !

प्रतिनिधी ४ एप्रिल

## कापसाचा भाव पोहोचला ९ हजारांवर, हमीभावाला टाकले मागे

**अकोला :** शेतकऱ्यांकडील कापूस संपुष्टात आला असताना आणि 'सीसीआय' नेही कापसाची खरेदी बंद केली असतानाही कापसाच्या दरात लक्षणीय सुधारणा झाली आहे. संपूर्ण हंगामात ७ ते ७ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल या दरावर रेंगाळलेल्या कापसाने आता मात्र खासगी बाजारात हमीभावावरही कुरघोडी केली आहे. शुक्रवारी अकोट येथे कापसाला ९ हजार रूपयांवर भाव मिळाला आहे. मात्र शेतकऱ्यांचे दिवाळे निघाल्यानंतर शेतकऱ्यांच्या 'पांढऱ्या' सोन्याला आलेली झळाळी काय कामाची, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहेत.

युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर वाढल्याने कृत्रिम धाग्याच्या किमती वाढल्या. परिणामी कापड उद्योगाने कापसाकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. कापसाचे खासगी बाजारातील दर वाढण्याचे हेही



एक कारण मानले जात आहे. शेतकऱ्यांना गरज असल्याने व साठविण्यासाठी जागा नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी सीसीआयकडे नोंदणी करून ८ हजार १०० रूपयांपर्यंत हमीभावात कापूस विकावा लागला तर अनेक शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांना ७ ते ७ हजार ५०० रूपये इतक्या कमी दरात आपले पांढरे सोने दिले आहे. आता शेतकऱ्यांकडे कापसाची कवडीही उरली नसताना झालेली भाववाढ त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. मागील वर्षीपेक्षा यंदा कापसाखालील लागवड क्षेत्र कमी होते. बाजारातील आवकच कमी असल्याने कापसाचे भाव वाढणार हे अपेक्षित मानले गेले तरीही संपूर्ण हंगामात कापसाला चांगला भाव मिळाला नाही. नेहमीप्रमाणे 'सीसीआय'ची कापूस खरेदी उशिरा सुरू झाल्याने शेतकऱ्यांना सुरुवातीला खासगी बाजारातच आपला कापूस आणावा लागला.

### काही दिवसांपासून लक्षणीय वाढ

◆'सीसीआय'ची खरेदी १५ मार्चला बंद झाली आहे, तरीही कापसाच्या दरात गेल्या काही दिवसांपासून लक्षणीय सुधारणा झाली. आता कापसाच्या दरात वाढ होत असली तरी शेतकऱ्यांकडे मात्र कापूस शिल्लक राहिलेला नाही. कापसाचे लागवड क्षेत्र कमी असताना आणि सुरुवातीला अतिवृष्टीने पिकावर परिणाम झालेला असतानाही कापसाचे उत्पादन मात्र चांगले झाले आहे.

# शिवसेना वसाहती मधील नागरिकांना प्यावे लागते मातकट पाणी

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** शिवसेना वसाहत नाही तर शहरात विविध भागात दूषित पाणी पुरवठ्याच्या तक्रारी येत आहेत. त्या भागातील लोक महापालिका प्रशासनाकडे तक्रारी करीत आहेत. तसेच ही समस्या का निर्माण झाली याचा शोध घेऊन नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करावा अशी मागणी आहे.

शिवसेना वसाहती मध्ये अस्वच्छ पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. गढूळ पाणी पिल्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. याचे भान ठेवून समस्या सोडवावी तसेच शुद्ध पाणी पुरवावे अशी मागणी केली जात आहे. या

## शहरातील विविध भागात दूषित पाणी पुरवठ्याच्या तक्रारी



परिसरात उपमहापौर यांचे देखील वास्तव्य आहे.

त्यांनी पुढाकार घेऊन हा भागच नाही तर शहरात निर्माण झालेली समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी केली जात आहे.

# पोलिस अधीक्षक अर्चित चांडक बेस्ट आयटी प्रोजेक्ट ट्रॉफीने सन्मानित

## अकोला पोलिस दलाचा देशपातळीवर सन्मान..!

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** ३ एप्रिल २०२६ रोजी नागपूर येथे आयोजित ६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीटच्या समारोप समारंभात केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांचे हस्ते, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद यांच्या उपस्थितीत पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' साठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीट २०२५-२६ अंतर्गत आयोजित संगणक जागरूकता स्पर्धेतील इव्हेंट मध्ये महाराष्ट्राला 'माहिती तंत्रज्ञानाने पोलिसांना सक्षम करण्यासाठी एनसीआरबीची रनिंग ट्रॉफी' प्रदान




करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' या अभिनव आयटी प्रकल्पाची सर्वोत्कृष्ट प्रकल्प म्हणून निवड करण्यात आली. या उल्लेखनीय यशामध्ये अकोला पोलिस दलाचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा करीता एनसीआरबी, नवी दिल्ली यांना महाराष्ट्र घटकाकडून या अगोदर पाच आय.टी. प्रोजेक्ट पाठविण्यात आलेले होते. त्यामधून 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट स्पर्धा' साठी महाराष्ट्राच्या वतीने 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' प्रकल्पाची निवड करण्यात आली. आहे. 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' चे सादरीकरण दिल्ली येथे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले. 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट स्पर्धा' साठी महाराष्ट्राच्या वतीने 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' प्रकल्पाची निवड करण्यात आली होती. प्रोजेक्ट त्रिनेत्र करिता अकोला येथील युवा उद्योजक किसन पनपालिया यांनी मोलाचे योगदान दिले आहे. हा प्रोजेक्ट आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हे प्रतिबंध, गुन्हेगारांची ओळख पटविणे, तसेच पोलिस कार्यक्षमता वाढविणे यासाठी विकसित करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होऊन पोलिस सेवांमध्ये अधिक पारदर्शकता आणि गतिमानता निर्माण झाली आहे. प्रोजेक्ट त्रीनेत्र मुळे गेल्या सहा महिन्यात सराईत गुन्हेगारांच्या गुन्हेगारीत ४८ टक्के नी घट झाली आहे. पोलीस दलाच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे अकोला जिल्ह्याचे तसेच महाराष्ट्र राज्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे. पोलिस अधीक्षकांनी प्रोजेक्ट करिता सहकार्य करणारे अधिकारी व अमलदार यांचे आभार मानले.

# पावसाने साचलेल्या पाण्यामुळे अडवली वाट

प्रतिनिधी ४ एप्रिल

**अकोला :** सध्या अवेळी पाऊस हजेरी लावत आहे. त्यामुळे स्वच्छता तसेच रस्त्यावर पाणी साचलेले दिसते. मोठी उमरी प्रभाग क्रमांक ४ विठ्ठल नगर परिसरात आवकाळी पावसामुळे रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिकांना त्रास होत आहे. येण्या जाण्यासाठी रस्ता राहिला नाही. नागरी समस्या निर्माण झाल्या आहेत. महापालिका प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले जात आहे.

शहराचे वैशिष्ट्य म्हणजे एक समस्या सुटली तर दुसरी उभी ठाकते. त्यामुळे संबंधित भागातील रहिवासी त्रास सहन करतात. अनेक रस्त्यावर खड्डे आहेत. ते वेळीच बुजवले जात नाही. आणि



अवकाळी पावसाचे पाणी खड्ड्यात साचते. त्यामुळे वाहन चालवणे कठीण होते. खड्ड्यातील पाण्याचा अंदाज येत नाही. तसा प्रकार दिसत आहे. विविध भागातील समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK